## भारत-चीनच्या सैनिकांमध्ये पुन्हा झटापट?



**तवांग** : भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये अरुणाचल प्रदेशमध्ये झटापट झाल्याची माहिती समोर आली आहे. ९ डिसेंबर रोजी दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये ही झटापट झाल्याचे समजते. या झटापटीत दोन्ही देशांचे मिळून जवळपास ३०पेक्षा अधिक सैनिक जखमी झाल्याची सूत्रांची माहिती आहे. तवांगजवळ ही झटापट झाली. याबाबत भारतीय लष्कराकडून अधिकृतरित्या माहिती अद्याप देण्यात आलेली नाही, पण वृत्तसंस्था एएनआयने याबाबत वृत्त दिले आहे. या झटापटीनंतर दोन्ही देशांमध्ये कमांडरस्तरीय चर्चाही झाली होती असे कळते. याआधी ऑक्टोबर २०२१मध्ये अरुणाचलमधील यांगसेमध्येही दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये वाद उफाळला होता. त्यानंतर पुन्हा एकदा अशी घटना घडली आहे.


मंगळवार, १३ डिसेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक १४५

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


पोलादपुरात विषारी गोळ्या बाळगणाऱ्यांवर गुन्हा/२

सीकेटी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद/३

विभागीय कबड्डी स्पर्धेत धाटाव संघ विजेता/८


# अन्नधान्यांच्या किमतीत घट

## सर्वसामान्यांना महागाईपासून मोठा दिलासा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महागाईपासून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अन्नधान्याच्या किमती कमी झाल्यामुळे किरकोळ महागाईचा दर ऑक्टोबरमध्ये ६.७७ टक्क्यांवरून नोव्हेंबरमध्ये ५.८८ टक्क्यांवर आला आहे. अन्नधान्य चलनवाढीचा दरही नोव्हेंबरमध्ये घसरला आणि तो ४.६७ टक्के राहिला. ऑक्टोबरमध्ये अन्नधान्य महागाई ७.०१ टक्के होती.

नोव्हेंबर महिन्यात शहरी आणि ग्रामीण भागात अन्नधान्य महागाईत घट झाली आहे. किरकोळ महागाई कमी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे खाद्यपदार्थांच्या महागाई दरात झालेली घसरण. ऑक्टोबर २०२२मध्ये अन्नधान्य चलनवाढीचा दर ७.०१ टक्के होता, तो नोव्हेंबरमध्ये ४.६७ टक्क्यांवर आला आहे.

शहरी भागातील किरकोळ महागाईचा दर ऑक्टोबरमध्ये ६.५३ टक्के होता, तो नोव्हेंबरमध्ये ३.६९ टक्क्यांवर आला आहे, तर ग्रामीण भागातील किरकोळ महागाईचा दर ऑक्टोबरमध्ये ७.३० टक्के होता, तो नोव्हेंबरमध्ये ५.२२ टक्क्यांवर आला आहे. पालेभाज्या आणि भाज्यांचा महागाई दर -८.०८ टक्क्यांवर आला आहे, तर फळांच्या महागाईचा दर २.६२ टक्के आहे.

वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने या वर्षी मे महिन्यापासून रेपो दरात सातत्याने वाढ केली होती. रिझर्व्ह बँकेने आतापर्यंत रेपो दरात २२५ बेसिस पॉईंटची वाढ केली व तो ६.२५ टक्क्यांवर नेला आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेतील ग्राहक किंमत निर्देशांकाच्या बास्केटमध्ये खाद्यपदार्थांच्या किमतीचा वाटा सुमारे ४० टक्के आहे. अन्नधान्यांच्या किमतीत घट झाल्याने सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



# करंजाडेत भाजपची भव्य प्रचार रॅली

## ▌माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या परिवर्तन पॅनलचा जोरदार प्रचार सुरू आहे. पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली करंजाडेमध्ये रविवारी (दि. ११) भव्य प्रचार रॅली काढण्यात आली होती. या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली करंजाडे ग्रामपंचायतीमध्ये परिवर्तन घडवण्याचा निर्धार भाजपने केला आहे. भाजपकडून थेट सरपंचपदासाठी मंगेश शेलार निवडणुकीच्या रिंगणात आहेत, तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून सुरज शेलार, देवकू वाघे, प्रभाग २मधून नंदकुमार भोईर, प्रीती शहारे, बिपीन गायकवाड, प्रभाग ३मधून सागर आंग्रे, शिल्पा नागे अनिता भोईर, प्रभाग ४मधून आतिष साबळे, अर्चना धामणस्कर व प्रिया फडके निवडणूक लढवित आहेत.

भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ करंजाडेमध्ये पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीत भाजप जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, उमेदवार आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

करंजाडे गावातून रॅलीस सुरुवात झाली. सेक्टर १, ३, ५, ६ तसेच कोळीवाडा, बौद्धवाडा, गणेशनगर आणि सेक्टर ४ परिसरात रॅली फिरली. भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह समाजाच्या विविध घटकांतील नागरिक उत्स्फूर्तपणे या रॅलीत सहभागी झाल्याचे पहायला मिळाले. या वेळी भाजप उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन मतदारांना करण्यात आले.

# बंगले घोटाळाप्रकरणी ठाकरे, वायकरांवर पोलिसांत गुन्हा दाखल करणार -किरीट सोमय्या



**अलिबाग : प्रतिनिधी**

ठाकरे आणि वायकर परिवारच्या नावावर असलेल्या मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील १९ बंगल्यांची नोंद बनावट कागदपत्रे तयार करून रद्द करण्यात आली आहे. या बंगले घोटाळा प्रकरणात बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात असल्याची माहिती भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवारी (दि. १२) पत्रकारांशी बोलताना दिली.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे व मनीषा रवींद्र वायकर यांच्या नावे मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे असलेल्या जमिनीवर १९ बंगले आहेत याची नोंद रद्द करण्यात आली आहे. ठाकरे, वायकर परिवाराच्या कार्लई येथील या बंगले घोटाळा प्रकरणाबाबत भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सोमवारी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी या वेळी पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

२१०४ साली रश्मी ठाकरे व मनीषा रवींद्र वायकर यांनी (कै.) अन्वय नाईक यांच्याकडून कोर्लई येथील जागा त्यावरील बांधकामासह विकत घेतली होती. या जागेवर १९ बंगले असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात आहे. अन्वय नाईक या घरांची घरपट्टी भरत होते. हे बंगले ठाकर, वायकर यांच्या नावे करावेत यासाठी पाठपुरावा करण्यात आला. ही घरे ठाकरे, वायकर यांच्या नावेदेखील झाली, असे सांगून याबाबत मी आवाज उठवल्यानंतर उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी दबाव टाकून २०२२मध्ये कागदपत्रामंध्ये फेरफार करून बनावट कागरपत्रांच्या आधारे या घरांची नोंदणी रद्द करून घेतली, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला. **(पान २ वर..)**

## शिवरायांबद्दल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोलेंचे बेताल वक्तव्य

**अकोला : प्रतिनिधी**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे कुणबी समाजाचे होते, असे म्हटले आहे. त्यामुळे वादाला तोंड फुटले आहे.

अकोल्यात एका कार्यक्रमानिमित्त आले असता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी शिवराय हे कुणबी समाजाचे असल्याचे वक्तव्य केले. पटोलेंच्या या विधानामुळे नवा वाद उसळण्याची शक्यता आहे.

## निवडक

### अनिल देशमुखांना जामीन, मात्र १० दिवसांची स्थगिती

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना भ्रष्टाचार आणि वसुली प्रकरणात जामीन मंजूर करण्यात आला आहे, मात्र तरीही देशमुख कोठडीतच राहणार आहेत, कारण मुंबई उच्च न्यायालयाने देशमुखांना जामीन दिल्याच्या निर्णयाला सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असून सीबीआयच्या विनंतीनंतर देशमुखांच्या जामिनाला न्यायालयाने १० दिवसांची स्थगिती दिली. त्यामुळे देशमुखांची लगेच सुटका होणार नाही.

### भूपेंद्र पटेल दुसऱ्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी

**अहमदाबाद** : भाजपने गुजरातमध्ये स्पष्ट बहुमताने सत्ता मिळविल्यानंतर मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकदा भूपेंद्र पटेल यांनी सोमवारी (दि. १२) शपथ घेतली. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह देशभरातील प्रमुख नेते उपस्थित होते.

## केंद्र शासनाचे अमृत २.० अभियान

# पनवेल मनपाच्या मलनिस्सारण प्रकल्पास ५० कोटी रुपये मंजूर

**पनवेल : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या माध्यमातून अमृत २.० अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेला ५० कोटी रुपये खर्चाच्या मलनिस्सारण प्रकल्पासाठी शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांनी पाठपुरावा केला होता.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानाची सन २०२१-२२ वर्षापासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पाणीपुरवठा, सरोवरांचे पुनरूज्जीवन व हरित क्षेत्र विकास इ. पायाभूत सुविधांची निर्मिती राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येणार आहे आणि यापूर्वीच्या अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील ४४ शहरांमध्ये मलनि:स्सारणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानुसार या अभियानांतर्गत राज्याच्या १८२३६.३९ कोटी प्रकल्प किमतीच्या राज्य जलकृती आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. **(पान २ वर..)**

> **पनवेल महापालिकेच्या मलनिस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाल्याने येथील वाढते नागरीकरण पाहता आता सांडपाणी प्रोसेसमध्ये सुधारणा आवश्यक आहे. शासनाने या प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल आभार! उर्वरित प्रकल्पालाही लवकरात लवकर मान्यता मिळावी.**
>
> **-परेश ठाकूर, माजी सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका**

# सहलीच्या बसला बोरघाटात अपघात
# दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू, ४६ जण जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खासगी क्लासच्या विद्यार्थ्यांना सहलीसाठी मुंबईहून लोणावळा येथे आलेली बस परतीच्या प्रवासात बोरघाटातील मॅजिक पॉईंटजवळ रविवारी (दि. ११) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास उलटली. या अपघातात बसमधील सर्व ४८ विद्यार्थी जखमी झाले. यातील दोन विद्यार्थ्यांचा उपचाराच्यादरम्यान मृत्यू झाला, तर काहींची प्रकृती गंभीर आहे.

मुंबई चेंबूर येथील मयांक कोचिंग क्लासच्या विद्यार्थ्यांची सहल एनबीएस टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल कंपनीच्या बस (एमएच ०४-जीपी २२०४)मधून लोणावळा येथे आली. बसमध्ये दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेले ४८ विद्यार्थी व दोन शिक्षक होते. परतीच्या प्रवासात बोरघाटातील मॅजिक पॉईंटजवळ रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास बस रस्त्याच्या कडेला उलटली. या अपघातात बसमधील सर्व ४८ विद्यार्थी जखमी झाले. अपघातानंतर विद्यार्थ्यांच्या किंचाळ्यांनी परिसर हादरला.

अपघाताचे वृत्त समजताच खोपोलीतील शासकीय यंत्रणांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सर्व जखमींना प्रथम खोपोली नगर परिषद रुग्णालयात दाखल केले. ४८ विद्यार्थ्यांपैकी ११ जण गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी राज म्हात्रे (वय १५, रा. चेंबूर) आणि हितिका खन्ना (वय १५, रा. चेंबूर) या दोन विद्यार्थ्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

दरम्यान, खोपोली नगर परिषद रुग्णालयात प्रथमोपचारानंतर ४१ विद्यार्थ्यांना पनवेल, कामोठे येथे हलविण्यात आले. पनवेल येथील अष्टविनायक रुग्णालयात दोन जखमी विद्यार्थी दाखल आहेत, तर खोपोलीतील जाखोटीया रुग्णालयात दोन विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. काही विद्यार्थ्यांवर किरकोळ उपचार करून पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

या अपघातप्रकरणी बसचालक शैलू कैलास ठाकूर (मूळ रा. झारखंड) याच्याविरोधात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# आमदार चषकाचा वडवली संघ मानकरी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**


पनवेल तालुक्यातील तोंडरे येथे पाटील इलेव्हन संघाच्या वतीने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक स्पर्धेचे विजेतेपद टावर ग्रुप अमृत ११ वडवली ब संघाने पटकाविले. भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते त्यांना रोख रक्कम एक लाख आणि आमदार चषक देऊन सोमवारी (दि. १२) गौरविण्यात आले.

तोंडरे येथील आझाद मैदानात पाच दिवस आमदार चषक क्रिकेट स्पर्धा रंगली. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, तालुका उपाध्यक्ष सचिन पाटील, स्पर्धेचे आयोजक तोंडरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व तालुका उपाध्यक्ष राम पाटील, सरपंच नारायण पाटील, भाजप युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस दिनेश खानावकर, बुर्दूल सरपंच चिंतामण पाटील, राजू कडू, पवन भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, खेळाडू आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. दरम्यान, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही या स्पर्धेला भेट देत शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत स्व. रामचंद्र मढवी प्रतिष्ठान उसाटणे यांनी द्वितीय, जय अंबिका जय हनुमान जोवेली तृतीय आणि स्व. रोहन स्पोर्ट्स यांनी चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. त्यांना रोख रक्कम व चषक देण्यात आला. मालिकावीर अजय कडू (वडवली), उत्कृष्ट फलंदाज विशाल पाटील (वडवली), उत्कृष्ट गोलंदाज धनंजय हिलाल (उसाटणे), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक महेंद्र धुळे (जोवेली) आणि अंतिम लढतीचा सामनावीर ऋतिक पाटिल (वडवली) ठरला. त्यांनाही बक्षीस देण्यात आले.

## स्लॅब कोसळून मुलाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**



पनवेलजवळील सुकापूर येथे नवजीवन सोसायटीच्या इमारतीचे दोन स्लॅब रात्री १२च्या सुमारास कोसळले. यात एका मुलाचा मृत्यू झाला आहे. शुभम सुरेश राजभर (वय १२) असे मृत मुलाचे नाव आहे.

तीन मजल्यांची नवजीवन ही इमारत आहे. या इमारतीचे पहिल्या आणि दुसऱ्या माळ्याचे स्लॅब कोसळले. घटना घडली त्या वेळी या इमारतीमध्ये तीन कुटूंब होती. इतरांनी वेळीच धावपळ केल्याने त्यांचे प्राण वाचले, मात्र बेडरूममध्ये झोपलेल्या शुभम राजभरचा मृत्यू झाला. त्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# 'धनुष्यबाण' कुणाचा? सुनावणी नव्या वर्षी




**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचा धनुष्यबाण हे पक्षचिन्ह कोणाचे यावर सोमवारी (दि. १२) मुख्य निवडणूक आयुक्तांसमोर सुनावणी झाली. या वेळी निवडणूक आयोगाने या प्रकरणाची सुनावणी पुढील वर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुढे ढकलली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले, मात्र मुख्य सुनावणीबाबत इतर अनेक कागदपत्रे सादर झाली होती तसेच आणखी दोन ते तीन अर्जही आले होते. त्यामुळे मुख्य निवडणूक आयुक्तांनी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात या प्रकरणावर सुनावणी सुरू होईल, असे सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ४० आमदार, १२ खासदार, अनेक पदाधिकारी, लाखो कार्यकर्ते बरोबर असल्याने खरी शिवसेना आपलीच असल्याचा दावा केला आहे.

आयोगाने कागदपत्रे सादर करण्यासाठी दिलेली २३ नोव्हेंबरची मुदत संपल्यावर कागदपत्रांची छाननी केली आहे. यानंतर सुनावणी होऊन युक्तिवाद होतील आणि मग निवडणूक आयोग यावर निर्णय देईल.

# मंदोस चक्रीवादळामुळे सतर्कतेचा इशारा

## खबरदारी बाळगण्याचे प्रशासनाकडून आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाच्या पूर्वसूचनांनुसार नैऋत्य बंगालच्या उपसागरावर मंदोस चक्रीवादळ तासांमध्ये १० किमी प्रतितास वेगाने वायव्य दिशेला केंद्रस्थानी आहे. ९ डिसेंबर पासून दक्षिण-पश्चिम बंगालच्या उपसागरावरील पुडूचेरीच्या किनाऱ्यापासून जवळजवळ वायव्य दिशेकडे सरकून ७५ ते ८५ किमी प्रति तास वेगाने उत्तर तामिळनाडू ओलांडण्याची दाट शक्यता आहे.

या हवामानाच्या परिस्थितीमुळे १० डिसेंबरपासून पुढील चार ते पाच दिवसांमध्ये महाराष्ट्रातील रायगडसह इतर जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह मध्यम ते हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय यंत्रणा व नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

समुद्र खवळलेल्या स्थितीत असल्याने मच्छीमारांनी मासेमारीसाठी खोल समुद्रात जाऊ नये. अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. शेतकरी बांधवांनी पिके मळणी, कापणीसाठी तयार असतील, तर ती पिके सुरक्षित ठिकाण ठेवावीत. फळे, भाजीपाला, शेत पिकांची सुरक्षित ठेवण करावी. जनावरेदेखील सुरक्षित ठिकाणी बांधावीत. अतिवृष्टीमुळे सखल भागात काही प्रमाणात पाणी साचण्याची शक्यता राहील. मेघगर्जनेसह वादळी वारे व मध्यम ते हलका पाऊस असल्याने विजा चमकण्याची चमकण्याची पडण्याची शक्यता आहे. गडगडाटी वाऱ्यासह पाऊस पडत असताना नागरिकांनी खुल्या, मोकळ्या भागात थांबू नये. विजेचे खांब, झाडे इत्यादी ठिकाणी उभे राहू नये. विद्युत उपकरणापासून दूर राहावे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

सर्व प्रशासकीय यंत्रणांनी व नागरिकांनी सतर्क रहावे. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी जवळच्या तहसील कार्यालय, पोलीस स्टेशनची संपर्क साधावा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या ०२१४१-२२२०९७/२२२११८ व ८२७५१५२३६३ अथवा टोल फ्री क्रमांक ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन



मुंबई : लोकनेते दिवंगत गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष प्रदेश कार्यालयात सोमवारी अभिवादन करण्यात आले. माजी मंत्री सदाभाऊ खोत, प्रदेश मुख्यालय सहप्रभारी सुमंत घैसास, विधीमंडळ कार्यालय प्रमुख गोपाळराव दळवी, सह-कार्यालयमंत्री भरत राऊत आदी उपस्थित होते.

# उद्योगातील कुशल मनुष्यबळासाठी अभ्यासक्रमांची गरज -ना. केसरकर

## जर्मनीच्या वाणिज्यदूतांनी घेतली सदिच्छा भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

जर्मनीसह विविध देशांतील उद्योगसमूह महाराष्ट्रात गुंतवणूक करीत आहेत. या उद्योगांना लागणारी कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन त्या पद्धतीचे अभ्यासक्रम शिक्षणक्रमात आवश्यक आहेत. आगामी काळातील ही गरज ओळखून शालेय शिक्षण विभागाने त्या दृष्टीने पाऊले उचलावीत, असे शालेय शिक्षण व मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.



जर्मनीचे वाणिज्यदूत अचिम फॅबिग यांनी सोमवारी (दि. १२) मंत्रालयात मंत्री केसरकर यांची सदिच्छा भेट घेतली. शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजीतसिंह देओल यांच्यासह शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी मंत्री केसरकर यांनी श्री. फॅबिग यांच्याकडून जर्मनीतील शिक्षण पद्धती, तेथील विविध उद्योगांसाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची गरज, देशात आणि महाराष्ट्रात गुंतवणूक केलेल्या जर्मन उद्योग समूहांसाठी लागणारे मनुष्यबळ आदींबाबत चर्चा केली.

श्री. फॅबिग यांनी येत्या काही दिवसात जर्मनीचे प्रतिनिधीमंडळ महाराष्ट्रात भेट देणार असून त्या वेळी याबाबत अधिक विस्तृत आणि तपशीलवार चर्चा होईल, असे सांगितले.

# लोकशाही दिनी एक अर्ज निकाली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहेत.

या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या पाच असून सोमवारी (दि. १२) आलेल्या अर्जांची संख्या चार असे एकूण प्राप्त अर्ज नऊ होते. त्यापैकी एक अर्ज निकाली काढण्यात आला. सध्या आठ तक्रारी प्रलंबित आहेत.

लोकशाही दिनी नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. यातून नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केला जातो.

# देशात लवकरच नवी टोल सिस्टीम?

## कॅमेऱ्यावर आधारित पद्धत विचाराधीन; प्रवासाचा वेळ वाचणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकार लवकरच नवीन टोल सिस्टिम आणणार आहे. सध्या फास्टटॅगवरून टोल जमा करण्याच्या सिस्टिमचा वापर करण्यात येत आहे. यामध्ये लवकरच बदल करण्यात येत असून एका नवी सिस्टिम अंमलात आणण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून कॅमेरावर आधारित टोल जमा करण्याच्या पद्धतीचा विचार सुरू आहे. या कॅमेऱ्यांना 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रीडर' म्हणून ओळखले जाईल.

कॅमेऱ्यावर आधारित या टोल जमा करण्याच्या पद्धतीचे मुख्य कारण नागरिकांचा टोल प्लाझावरील वेळ वाचवणे हा आहे. सध्या भारतातील ९७ टक्के टोल प्लाझावर फास्टटॅगचा वापर केला जातो, पण तरीही नागरिकांना या टोल प्लाझावर होणाऱ्या गर्दीला सामोरे जावे लागते. टोल प्लाझावर एएनपीआर सेट केल्याने कदाचित ही गर्दी जमा होणार नाही आणि नागरिकांचा वेळ वाचेल अशी शक्यता सरकारने व्यक्त केली आहे.

देशातील सर्व राष्ट्रीय महामार्गावरून टोल प्लाझा हटवण्यात येतील आणि त्या जागी एएनपीआर इन्स्टॉल केले जाईल. एएनपीआरद्वारे गाडीच्या नंबर प्लेटवरील नंबरची नोंद करण्यात येईल आणि त्या व्यक्तीच्या बँक अकाउंटमधून पैसे भरले जातील.

या नव्या पद्धतीमुळे टोलनाक्यांवर लागणारी वाहनांची रांग कमी होणार आहे. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांचा वेळही वाचणार आहे.

# पोलादपुरात विषारी गोळ्या बाळगणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नदीपात्रात मासेमारी करण्यासाठी विषारी गोळ्यांची विक्री करण्याकरिता स्वत:च्या राहत्या घरामध्ये बाळगून स्वत:च्या आणि फिर्यादीच्या जिवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

पोलादपूर तालुक्यात मासेमारीच्या गोळ्या निष्काळजीपणे हाताळल्याप्रकरणी अनेकांना जिवानिशी मुकावे लागले आहे. या गोळ्यांच्या विक्रीवर कायद्याने बंदी असताना अनेकजण बेकायदेशीररित्या स्वत:च्या फायद्याकरीता या गोळ्यांची विक्री करीत असल्याची तक्रार बेबी आप्पा सुतार या ७५ वर्षीय महिलेने केल्यावरून पोलादपूर पोलिसांनी शहरातील गाडीतळ येथील फिर्यादीच्या घरातून आकाश बाबू सुतार (वय २२) आणि राजेश रवींद्र जांभळेकर (वय ४०) यांच्याकडून २५० ग्रॅम वजनाच्या अंदाजे २०० रूपये किंमतीच्या सफेद रंगाच्या मासे मारण्याच्या विषारी गोळ्या हस्तगत केल्या आणि दोन्ही आरोपींविरूध्द दखलपात्र गुन्हा दाखल केला. हवालदार संदीप शिरगांवकर अधिक तपास करीत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात विविध उपक्रमांना प्राधान्य

## इंटर्नशिप प्रोग्रामच्या प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे इंडिअन एक्स्प्रेस वृत्तपत्र इंटर्नशिप प्रोग्रामच्या प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा सोमवार दि. १२ डिसेंबर २०२२ रोजी १०:३० वाजता महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या अंतर्गत आयोजित केला होता.या कार्यक्रमासाठी इंडिअन एक्स्प्रेसचे व्यवस्थापक मा. संदीप दळवी आणि त्यांचे सहकारी उपस्थीत होते. या सोहोळ्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस.के.पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व प्लेसमेंट सेल चे प्रमुख प्रा. एस.एस.कांबळे यांनी उपस्थिती दर्शविली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के.. पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना .महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेतला आणि इंटर्नसची प्रशंसा केली. तसेच महाविद्यालयात प्लेसमेंटसाठी कोणकोणते कार्यक्रम राबविले जातात हे वर्तविले . या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. एस.एस.कांबळे यांनी केली. मा. संदीप दळवी यांनी भविष्यामध्ये महाविद्यालयास नवनवीन इंटर्नशिप प्रोग्राम प्रदान करण्याचे आश्वासन दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्लेसमेंट समन्वयक श्रीकांत जाधव यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. एस.एस.कांबळे आणि त्यांचे सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब, संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा. श्री. वाय. टी. देशमुख,पनवेलचे मा. आमदार श्री. प्रशांत ठाकुर व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## प्लेसमेंट ड्राइव्हही उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त) येथे ICICI बँक आणि NIIT द्वारे आयोजित प्लेसमेंट ड्राइव्ह सोमवार दि.१२ डिसेंबर २०२२ रोजी ११:३० वाजता महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या अंतर्गत आयोजित केला होता.या कार्यक्रमासाठी आय.सी.आय.सी.आय बँक, कोकण विभाग, मुंबईचे उपमहाव्यवस्थापक मा. निरंजन मोहिते आणि त्यांचे सहकारी सहाय्यक व्यवस्थापक श्री. आशिष राऊत उपस्थीत होते. या प्लेसमेंट ड्राइव्हसाठी प्लेसमेंट सेल चे प्रमुख प्रा. एस.एस. कांबळे आणि प्लेसमेंट सेलच्या इतर सदस्यांनी उपस्थिती दर्शविली.

या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. एस.एस. कांबळे यांनी केली. मा. निरंजन मोहिते यांनी संबंध व्यवस्थापक या पदासाठीच्या निवड प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच आय.सी.आय. सी.आय बँकेचे एच.आर. कार्यकारी श्री. मितेश आहेर यांनी निवड प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्लेसमेंट समन्वयक श्रीकांत जाधव यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. एस.एस.कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## पान १ वरून

पान १ वरून

### बंगले घोटाळाप्रकरणी ठाकरे, वायकरांवर पोलिसांत गुन्हा दाखल करणार -किरीट सोमय्या

अशा प्रकारे कागदपत्रांमध्ये फेरफार करून घरांची नोंदणी रद्द करणे बेकायदेशीर आहे. बनावट कागदपत्र तयार केल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. यासाठी ग्रमाविकासमंत्री गिरीश महाजन यांची मी दोन दिवसांत भेट घेणार आहे. त्यांच्याशी चर्चा करणार आहे. बनाबवट कादपत्र तयार केल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दखाल करावा अशी मागणी ग्रमाविकासमंत्र्यांकडे करणार आहे. हा गुन्हा शासनाने नोंदवावा की मी नोंदवावा याबात निर्णय घेतला जाईल. त्यानंतर गुन्हा नोंदविण्यात येईल, असे सोमय्या यांनी सांगितले.

ठाकरे, वायकर परिवाराच्या नावावर असलेल्या कोर्लई येथील १९ बंगल्यांची नोंद रद्द करण्यात आली आहे. या प्रकरणी घोटाळा झाला असल्याचे रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनीही मान्य केल्याचा दावा या वेळी सोमय्या यांनी केला.

### पनवेल मनपाच्या मलनिस्सारण प्रकल्पास ५० कोटी रुपये मंजूर

यामध्ये पनवेल महापालिकेच्या मलनिस्सारण प्रकल्पाचा समावेश असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (ठाणे) मुख्य अभियंता यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार त्यास राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या २२ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत मंजुरी दिली दिलेली आहे. पनवेल महापालिकेच्या ५० कोटी ३४ रुपये खर्चाच्या मलनिस्सारण प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे २९ गावांतील पाणीटंचाई कायमची दूर होणार असून मलनिस्सारण योजनेमुळे रहिवाशांचे आरोग्यमान उंचावण्यास मदत होणार आहे. पनवेल शहरात अस्तित्वात असलेले मलनि:सारण केंद्र अपुरे पडत आहे. या मलनिस्सारण केंद्र बांधणीमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.

*केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियान अंतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रातील २२ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत प्रशासकीय मंजुरीकरिता ठेवण्यात आलेले प्रस्ताव...*

*महापालिका क्षेत्रातील २९ गावांकरिता*

*१. पाणीपुरवठा योजना रु.१४८. १५ कोटी*

*२. मलनि:सारण योजना रु.२०७. ५८ कोटी*

*३. पनवेल शहरात १५.५० दललि क्षमतेचे मलनि:सारण केंद्र बांधणे रु. ५०.३४ कोटी*

*४. पिसार्वे तलाव पुनरूज्जीवित करणे रु.१३.७६ कोटी*

*यामध्ये आता सुरुवातीला फक्त ५०.३४ दलालि क्षमतेचे मलनिस्सारण केंद्र बांधणे या कामास मंजुरी मिळाली आहे.*

# ज्येष्ठ काँग्रेस नेत्याचे धक्कादायक विधान

**भोपाळ** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री राजा पटेरिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल धक्कादायक विधान केले आहे. मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यात त्यांनी एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना मोदींची हत्या करण्यासाठी तयार राहा, असा सल्लाच देऊन टाकला. त्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार काँग्रेस नेत्यांची एक बैठक रविवारी आयोजित करण्यात आली होती. काँग्रेस नेते राजा पटेरिया यांनी या बैठकीला संबोधित केले. या वेळी त्यांनी वादग्रस्त विधान केले, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल हे सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे लिजधारक **श्री. बसंतीलाल डी. ओस्टवाल** यांच्या नावे असलेला खालील वर्णनाचा भूखंड त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**- भूखंडाचे वर्णन -**

**मौजे-द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड**

| भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| ४१ | ४४ | ४०० चौ. मी. |

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल**

दि. १२/१२/२०२२

**सही/-**

**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

## निवडक

### रेल्वेच्या धडकेत अज्ञात व्यक्ती जखमी

**पनवेल :** मानसरोवर ते खारघर रेल्वे स्टेशनवर रेल्वेच्या धडकेत एक व्यक्ती जखमी अवस्थेत आढळल्याने पनवेल उपजिल्हा रुग्णालयात त्याला उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. पनवेल पोलीस या जखमी व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. जखमी व्यक्तीचे वय अंदाजे २० वर्षे, उंची पाच फूट सहा इंच, अंगाने मध्यम, चेहरा उभट, नाक सरळ, केस वाढलेले काळे, मिशी बारीक आहे. अंगात काळा टी शर्ट, निळी जीन्स आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे दुरध्वनी–०२२२७४६७१२२ किंवा मोबाइल क्रमांक ९४९४९१२२९४ यावर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आर. आर. पाटील यांनी केले आहे.

### डेरवली येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील डेरवली गावातून एक महिला राहत्या घरातून कोणास काही न सांगता निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली



आहे. त्यानुसार पोलीस बेपत्ता महिलेचा शोध घेत आहेत. शोभा चंद्रकांत चव्हाण (वय ५०) असे बेपत्ता महिलेचे नाव असून उंची अंदाजे पाच फूट, रंग गोरा, बांधा मजबूत, केस काळे व लांब, अंगात साडी नेसलेली आहे. सोबत कपड्यांची बॅग आहे. ही महिला डेरवली येथील राहत्या घरातून न सांगता निघून गेली असल्याने संतोष चंद्रकांत चव्हाण यांनी ती हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात केली. या महिलेबाबत कोणास माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस नाईक डी. एस. चव्हाण यांनी केले आहे.

# सीकेटी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद

## मान्यवरांची उपस्थिती; इंग्रजी भाषा विषयावर विचारमंथन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इंग्रजी विभाग आणि इंग्लिश लँग्वेज टीचर्स असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १० डिसेंबर या कालावधीत इंडिअन इंग्लिश लँग्वेज टीचिंग : इमिटेटिव्ह ऑर जनरेटिव्ह या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचा उद्घाटन समारंभ गुरुवारी (दि. ८) झाला. या वेळी उपस्थित जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयाचे कौतुक केले.

प्रो. डॉ. रजनीश कामत, कुलगुरू, होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, जेरी पिंटो, ख्यातनाम कादंबरीकार आणि जोबर्ट इ. अबुवा, कार्यकारी संचालक, इंगिल्श भाषा कार्यक्रम, न्यू जर्सी, अमेरिका हेदेखील या वेळी उपस्थित



होते. या वेळी जेरी पिंटो यांनी भाषा ही अनुकरणशील किवा सृजनशील असते, असे मत मांडले. या परिषदेचा सामारोप समारंभ शनिवारी (दि. १०) झाला. या वेळी प्रसिद्ध सिनेअभिनेते अन्नू कपूर हे प्रमुख पाहुणे लाभले होते.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर.व्ही. येवले, प्रा. एस. एन. परकाळे, प्रा. आर. आर. आगलावे, प्रा. ए. एम. शिंगोटे, प्रा. ए. एम. हिरे तसेच इएलटीएआय सचिव डॉ. के. इलँगो, सहसचिव डॉ. रामकृष्णन भिसे, मुंबई विभाग अध्यक्ष डॉ. सचिन भुंबे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

### तीन दिवस विविध उपक्रम उत्साहात

**या तीन दिवसीय परिषदेत देश–विदेशातील विविध महाविद्यालये आणि संस्थांतील ४२४ प्राध्यापक, व्याख्याते, स्वयंसेवक सहभागी झाले होते. परिषदेत शोधनिबंध सादरीकरण, विविध कार्यशाळा, गोलमेज परिषद इ. कार्यक्रम झाले.**



## सोमाटणे गावात काँक्रीटीकरणाचा शुभारंभ; भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक कार्यक्रम आमदार निधीतून सोमाटणे गावातील सोमजाई मंदिर परिसराचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या काँक्रिटीकरण कामासाठी उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक कार्यक्रम आमदार निधीतून आठ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या भूमिपूजनावेळी सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश गाताडे, भाजप बूथ अध्यक्ष धनंजय पाटील, पोयंजे विभागीय युवा अध्यक्ष जयेंद्र मुंडे, माजी सदस्य रवींद्र कांबळे, आत्माराम पाटील, सामाजिक कार्यकर्ते मारुती पाटील, संदीप पाटील, विलास पाटील आदी उपस्थित होते.



## पनवेलमध्ये ३० ड्रमर्सकडून वादनाचा थरार

### परेश ठाकूर यांनी केले वाद्यकलेचे कौतुक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व कल्याणी कला सांस्कृतिक अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील वडाळे तलाव या ठिकाणी सूर पनवेलचा कार्यक्रमांतर्गत रविवारी (दि. ११) नागरिकांना ३० ड्रमर्सचा वादनाचा थरार पाहायला मिळाला. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली व ड्रम वादकांचे कौतुक केले.

पनवेलची नवी सांस्कृतिक ओळख बनलेल्या वडाळे तलावाजवळ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशनच्या वतीने प्रत्येक आठवड्यात सूर पनवेलचा या उपक्रमांतर्गत संगीताचे कार्यक्रम आयोजित करण्यात येते. पनवेलमधील तरुणांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी तसेच नागरिकांच्या दिवसाची सुरुवात संगीतमय आणि आनंदी होण्यासाठी या उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमाअंतर्गत रविवारी नागरिकांना ३० ड्रमर्सच्या एकत्रित वादनाचा थरार पाहायला मिळाला.

या कार्यक्रमाला पनवेल महानगर पालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन या ड्रम वादकांचे कौतुक केले. या वेळी भाजप सांस्कृतिक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, शहर संयोजक निखिल गोरे, किशोर पांडे, मिलिंद राणे, नूतन पाटील आदी उपस्थित होते.





**कळंबोली : लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, दत्ता बिनवडे, प्रकाश शेलार, विनोद बोरसे, सिद्धेश बनकर, देविदास खेडकर, सतीश गर्जे, सुशील शिरसाट, कार्यालयीन चिटणीस जगदिश खंडेलवाल, प्रियंका पवार, मनिषा निकम, दुर्गा सहानी आदी उपस्थित होते.**

## ‘खारघर फेस्ट’ची नागरिकांना मेजवानी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर वूमन सोशल असोसिएशनच्या माध्यमातून खारघर फेस्ट २०२२ या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. ११) भेट दिली तसेच या उपक्रमाचे कौतुक केले.

खारघर सेक्टर ४ मधील आदित्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या मैदानात खारघर वुमन सोशल असोसिएशनच्या वतीने खारघर फेस्ट २०२२ या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. खारघर परिसरातील विविध गृहनिर्माण सोसायटीमधील नागरिक तसेच मुलांच्या प्रतिभेला प्रोत्साहन





देण्याकरिता या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या उत्सवामध्ये खारघर परिसरातील विविध महिला उद्योजकांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्याकरिता व व्यवसायाकरिता स्टॉल लावण्यात आले. या उत्सवाला रविवारी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली तसेच खारघर वुमन सोशल असोसिएशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी महिला बालकल्याण समिती सभापती हर्षदा अमर उपाध्याय, युवा नेते अमर उपाध्याय, मधुमिता जना, शामला सुरेश, रोजी जॉर्ज, आरती शर्मा, भावना गुप्ता, सीमा सिसोदिया यांच्यासह इतर असोशिएशनचे सदस्य आदी उपस्थित होते.

## गव्हाण विद्यालयात वृक्षारोपण, स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड विभागात आयोजित करण्यात आलेल्या कृतज्ञता सप्ताहाची सांगता अनेक विद्यालयांमध्ये विविध उपक्रमांनी झाली. त्यानुसार संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्येही विविध उपक्रम राबविण्यात आले. सोमवारी (दि. १२) विद्यालयाच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले तसेच विद्यालयाच्या परिसराची स्वच्छता करून स्वच्छता अभियानही राबविण्यात आले.

विद्यालयाच्या प्रांगणामध्ये प्राचार्या साधना डोईफोडे, उपप्राचार्य प्रमोद मंडले, संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यालयाचे सेवक जनार्दन खैरे व धनाजी ठाकूर यांचे विशेष सहकार्य लाभले. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त





सहभाग नोंदवला.

सायंकाळी विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या सभेमध्ये खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या कृतज्ञता सप्ताहानिमित्त विभागीय स्तरावर झालेल्या निबंध, वक्तृत्व, क्रीडा, कला व सांस्कृतिक आदी स्पर्धेतील स्पर्धकांना या वेळी गौरविण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांची भाषणेही या वेळी झाली. आरोही कोळी हिने हिंदीतून विभाग स्तरावरील विजयी भाषण तर दीक्षा वर्तक हिने मराठीतून उस्फूर्त भाषण केले.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, उपप्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर आणि इतर शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले. सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षाला पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## वीर वाजेकर महाविद्यालयात परिसंवाद

**उरण : वार्ताहर**

महाविद्यालयात खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (दि. १२) परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. संदीप घोडके, प्रा. राम गोसावी, प्रा. दिलीप केंगार, प्राचार्य डॉ. पी. जी. पवार आदींनी मनोगतातून खासदार शरद पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बळीराम पवार यांनी केले, तर प्रा. रश्मी पुरके यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास कार्यालयीन प्रमुख बाळकृष्ण दगडे, वरीष्ठ लिपिक अविनाश पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. चिंतामण धिंदळे राष्ट्रीय सेवा योजनेचे चेअरमन यांनी आभार मानले.



## संपादकीय

# जिवावरचे राजकारण

लोकशाही व्यवस्थेत टोकाचा विरोध समजून घेण्याजोगा असला तरी एकमेकांच्या जिवावर उठण्याचा प्रकार मात्र लोकशाहीच्या कुठल्याच तत्त्वात बसत नाही. लोकशाही सोडा, माणुसकीच्या तत्त्वातही हे असले प्रकार बसत नाहीत. भारतीय जनता पक्षाला मिळणारे वाढते जनसमर्थन विरोधकांच्या पोटात गोळा आणणारे आहे हे खरे. आणि त्यातूनच आता जिवावरचे राजकारण सुरू होताना दिसते आहे.

**ज्या प्रकारे भारतातील जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या मागे ठामपणे उभी राहिली आहे, ते पाहता विरोधकांना नैराश्य येणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. खरे सांगायचे तर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचा अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे, परंतु याला कारणीभूत पंतप्रधान मोदी नव्हेत, तर या पक्षांचीच भूतकाळातील पापे आहेत. मध्य प्रदेशातील काँग्रेस नेते राजा पटेरिया यांनी मोदींची हत्या करण्यासाठी सज्ज व्हा असा अत्यंत उद्दामपणे दिलेला आव्हानवजा इशारा काँग्रेसच्या या नैराश्याचे द्योतक आहे. अलीकडेच निवडणुकांचे वेळी पंजाबच्या दौऱ्यावर गेलेल्या पंतप्रधान मोदी यांच्या सुरक्षा व्यवस्थेत हेतुपुरस्सर गंभीर त्रुटी ठेवणाऱ्या तेथील तत्कालीन काँग्रेस सरकारची चाल लपून राहिली नव्हती. तेव्हाच्या पंजाब सरकारच्या संतापजनक आणि संशयास्पद 'थंडपणा'मुळे पंतप्रधान मोदी यांच्या मोटारींचा ताफा पाकिस्तान सरहद्दीपासून अवघ्या काही फर्लांगांवर अडकून पडला होता. या त्रुटीमुळे काँग्रेस पक्षाचा खरा चेहरा उघड झाला. आता मध्य प्रदेशातील काँग्रेस नेते पटेरिया यांच्या धिक्काराई विधानामुळे काँग्रेसची विखारी भावना पुन्हा एकवार उघड झाली आहे. गेल्या आठवड्यात महाराष्ट्रातील भाजपचे ज्येष्ठ नेते व उच्च शिक्षण व तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर पिंपरी येथे शाई फेकण्यात आली. पैठण येथे काही दिवसांपूर्वी चंद्रकांत पाटील यांनी आंबेडकर, फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासंदर्भात केलेल्या विधानावरून वादंग निर्माण झाला. आंबेडकर, फुले व कर्मवीर भाऊराव यांना शाळा सुरू करण्यासाठी सरकारने अनुदान दिले नाही, तर त्यांनी अक्षरश: लोकांकडे भीक मागून पैसा गोळा करून शाळा सुरू केल्या अशा आशयाचे वक्तव्य त्यांनी केले. चंद्रकांत पाटील यांच्या या उद्गारांचा विरोधकांकडून जागोजाग निषेध करण्यात आला. त्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी आपल्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात येत असल्याचे सांगून केलेल्या वक्तव्याबाबत दिलगिरीही व्यक्त केली, परंतु या प्रकरणाची परिणती शनिवारी शाईफेकीच्या घटनेत झाली. महापुरुषांबाबत बोलताना सगळ्यांनीच जबाबदारीने बोलले पाहिजे याबाबत कुणाचेही दुमत असणार नाही, परंतु झालेल्या शाईफेकीचे समर्थनही करता येणार नाही. चंद्रकांत पाटील यांच्यावर शाई फेकण्याचा जो प्रकार पिंपरी येथे घडला, तो नक्कीच संशयास्पद स्वरुपाचा आहे. मंत्रिपदी असलेल्या चंद्रकांत पाटील यांच्याजवळ एखादी व्यक्ती जातेच कशी? बंदोबस्ताला असलेले पोलीस तेव्हा काय करत होते, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. सुरक्षा व्यवस्थेत ढिलाई केल्याबद्दल या प्रकरणी ११ पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे. यात पोलिसांची चूक नसावी. पोलिसांची वाटल्यास बदली करावी, निलंबनाची कारवाई करू नये अशी विनंतीही नंतर पाटील यांनी गृहखात्याकडे केली. शाईफेकप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून चौकशीअंती यामागील कारस्थान उघड होईल. भाजपच्या नेत्यांच्या वाट्याला येणारा विरोधकांचा हा जीवघेणा प्रखर विरोध लोकशाही व्यवस्थेला लांछनास्पद आहे. याचा जनता योग्य तो समाचार घेईलच.**

# ढगाळ वातावरणामुळे आंबा, काजू उत्पादक धास्तावले

**खबरबात**
**महेश शिंदे**


सातत्याने पडणाऱ्या अवेळी पावसामुळे आंबा आणि काजू उत्पादक धोक्यात आलेले असतानाच पुन्हा एकदा गेली दोन दिवसांपासून आलेल्या ढगाळ वातावरणामुळे आंबा आणि काजू उत्पादक चांगलेच धास्तावले आहेत. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार रविवारी संध्याकाळी महाडमध्ये अचानक पावसाने हजेरी लावली होती. महाडमधील शेतकरी आंब्याचा विमा मोठ्या प्रमाणात काढतो, यातुन त्याला नुकसानीमधुन थोडाबहुत आधार मिळतो, मात्र या वर्षी विमा कंपन्यांनी प्रिमीयममध्ये भरमसाठ वाढ केल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी या विम्याकडे पाट फिरवली आहे.



गेली दोन दिवसांपासून महाडसह राज्यातील विविध भागात अवेळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला असून त्यानुसार काही भागात पाऊस पडत आहे. महाड तालुक्यात रविवारी सायंकाळच्या वेळी अचानक काही भागात पावसाने हजेरी लावली होती तर सोमवारी सकाळपासूनच दिवस भर महाडमध्ये ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. अचानक वातावरणात झालेल्या बदलावा मुळे आणि पडणाऱ्या पावसमुळे काही प्रमाणात आलेला आंब्याचा मोहर आणि काजू मोहर गळून जाण्या बरोबरच त्याच्यावर विविध रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तालुक्यात काही भागात रविवारी पाऊस शिंपडून गेला कृषी विभागाच्या यादीनुसार जवळपास २५० आंबा उत्पादक आहेत. या उत्पादकांना यावर्षी आंबा पीक घेताना बदलत्या वातावरणाचा परिणाम सहन करावा लागणार आहे.

ढगाळ वातावरणाचा फटका जसा आंबा व काजू उत्पादकांना बसला आहे. तशाच काही प्रमाणात वाल, पावटा, मुग, चवळी ही कडधान्य पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांनादेखील फटका बसणार आहे. त्याचप्रमाणे अवकाळी पावसाचा फटका वीट उत्पादक शेतकऱ्यांना देखील जाणवणार आहे. त्याच बरोबर वातावरणात झालेल्या बदलावा मुळे मानवी जीवनावर देखील याचा परिणाम होणार असून सर्दी, खोकला, ताप, घसा दुखणे, मळमळणे, डोके जड होणे असे अनेक आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागणार आहे. सध्या महाड तालुक्यात सर्दी खोकला आणि ताप हा आजार मोठ्या प्रमाणात सुरू आहे.





महाडमध्ये कोसळलेल्या या अवकळी पावसामुळे शेती दमट होऊन कडधाण्य पिका चांगलीअसली तरी या पावसामुळे कीड रोग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंबा आणि काजू मोहर येण्यास आत्ताच सुरवात असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महाड मध्ये आंबा बागायत शेतकरी मोठ्या प्रमाणात असुन बांधावरील लागडीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे या आंब्याची भात शेती वेळी देखभाल होत नाही. परीणामी आंब्याला मोहर उशीरा येतो. हा आंबा हातात यायला मे मध्यान उजाडते त्यामुळे महाडच्या आंबा शेतकऱ्यांना योग्य बाजार भाव मिळत नाही. तसेच खरेदी विक्री संघ आणि कृषी उत्पन्न बाजार समितीत आंब्याची खरेदी करत नसल्याने शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठेतच आंबा विकावा लागतो.

पुर्वी विमा कंपन्या ह्या शासनाच्या अधिन काम करत असत मात्र आता केवळ फायदा या उद्देशाने काही विमा कंपन्या शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. यावर सरकारने काहीतरी उपाय करावा, अशी मागणी येथील शेतकरी सतत करीत असतो. भात पिकात नफा मिळत नाही मात्र आंबा पिकत थोडेफार पैसे येथील शेतकऱ्यांना मिळतात. मात्र उदासीन तालुका कृषी विभागात प्रशासकीय पातळीवर शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला वेळ नाही तर विमा कंपनी केवळ लुटमार करीत आहेत. अशा वेळी या शेतकऱ्यांनी दाद तरी कोणाकडे मागावी, असा सवाल निर्माण होत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# ब्लूटूथच्या माध्यमातून हॅकर्स मिळवू शकतात तुमचे डिटेल्स

आजकाल प्रत्येक स्मार्टफोनमध्ये ब्लूटूथ असतेच. अनेकदा युजर्स ते डिस्कवरी मोडमध्येच राहू देतात. म्हणजे कोणीही तुमच्या डिव्हाइसचे ब्लूटूथ सहज शोधू शकते. अशात हॅकर्सचीही या फिचरवर नजर असते. जर तुम्हीही अनेकदा ब्लूटूथ चालू ठेवत असाल आणि ते डिव्हाइस पेअरिंगसाठी वापरत असाल तर, तुम्हाला सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. असे न केल्यास मोठे नुकसान होऊ शकते. हे टाळण्यासाठी आधी Bluebugging म्हणजे काय हे माहित असणे आवश्यक आहे. ज्याच्या मदतीने डिव्हाइसचे नियंत्रण हॅकरच्या हातात जाऊ शकते. फक्त ब्लूबगिंगच नाही तर, हॅकर्स ब्लूस्नार्फिंग आणि ब्लूजॅकिंग वापरून युजर्सच्या डेटामध्ये प्रवेश करू शकतात. ब्लूबगिंगबद्दल म्हणजे काय आणि ते टाळायचे ते जाणून घेऊया.




Bluebugging Attack अतिशय धोकादायक आहे. यामध्ये हॅकर्स व्हिक्टिमच्या डिव्हाईसमध्ये प्रवेश करून कंटेंट मिळवण्याचा प्रयत्न करतात. यासाठी ब्लूटूथ कनेक्शनची मदत घेतली जाते. कनेक्शन बदलून, युजर्सचा पासवर्ड आणि इतर तपशील चोरण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी हॅकर्स आधी व्हिक्टिमच्या डिव्हाइसमध्ये प्रवेश करतात आणि नंतर मालवेअर इन्स्टॉल करतात. याच्या मदतीने ते भविष्यात व्हिक्टिमच्या डिव्हाइसवर सहज प्रवेश करू शकतात. याद्वारे यूजर्सची हेरगिरी सुद्धा केली जाते. हा प्रकार इतका धोकादायक आहे की, हॅकर्स फोनवरील संभाषणही ऐकू शकतात. याशिवाय, व्हिक्टीमचा मेसेजेही वाचू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

Bluetooth Attack करण्यासाठी हॅकर तुमच्या रेंजमध्ये असणे आवश्यक आहे. असे अटॅक्स सहसा सार्वजनिक ठिकाणी घडतात. कोणतीही अज्ञात Bluetooth Pairing स्वीकारू नका आणि काम करत नसताना डिव्हाइसचे ब्लूटूथ बंद ठेवा. यासाठी हल्लेखोर सॉफ्टवेअरमधील त्रुटींचा फायदा घेतात. डिव्हाइस आणि सॉफ्टवेअर अपडेटेड ठेवा.

तुमच्या डिव्हाइसचे ब्लूटूथ डिस्कवरेबल असल्यास, ते बंद करा. जर तुम्ही ऑडिओ स्पीकर किंवा इअरबड्स सारख्या डिव्हाइसशी ब्लूटूथ जोडणार असाल, तर यासाठी तुमचे घर किंवा खासगी जागा वापरा. गर्दीच्या ठिकाणी असे करून हॅकर्स तुम्हाला टार्गेट करू शकतात.

# वृत्तनिवेदिका ते सशक्त अभिनेत्री स्मिता पाटील

**निमित्त**

रंगाने काळ्या किंवा सावळ्या असणाऱ्या व्यक्तीकडे आपल्या देशात वेगळ्याच नजरेने पाहिलं जातं. बॉलिवूडमध्येही रंग हीच महत्त्वाची समजली जाते. गोऱ्या रंगाच्या व्यक्तीला आपण अभिनेता किंवा अभिनेत्री म्हणून स्वीकारतो. पण रंगाने सावळ्या असणाऱ्या स्मिता पाटीलने या सर्व गोष्टींना छेद दिला, हे सर्व समज मोडून काढले. आपल्या अभिनयाच्या आणि आकर्षक व्यक्तीमत्वाच्या स्मिताने भारतीय चित्रपटसृष्टीवर राज्य केलं. तिच्या मृत्यूला आज जवळपास ३५ वर्षे होऊन गेली तरी ती अनेकांच्या कायम लक्षात आहे. सौंदर्याची परिभाषा बदलणाऱ्या या स्मिता पाटीलचा आज स्मृतीदिन आहे.

स्मिता पाटील हिचा जन्म पुण्यात झाला. वडील शिवाजीराव पाटील हे राजकारणी आणि समाजवादी विचारांचे तर आई विद्याताई पाटील या समाजसुधारक. त्यामुळे घरातील वातावरण हे अत्यंत पुरोगामी होतं. त्याचा परिणाम स्मिताच्या आयुष्यावर झाला. स्मिता शाळेत असल्यापासून नाटकात भाग घ्यायची. तसेच ती एक ॲथलिटही होती. तिने राज्यस्तरीय स्पर्धेतही भाग घेतला. पण चित्रपटाशी तिचा वा तिच्या परिवाराशी काही संबंध नव्हता.

नंतरच्या काळात स्मिता आपल्या कुटुंबियांसोबत या मुंबईला शिफ्ट झाल्या. त्याचवेळी मराठी दूरदर्शनची सुरुवात झाली होती. स्मिता आपल्या दूरदर्शनमध्ये काम करत असलेल्या मैत्रिणीसोबत दूरदर्शनमध्ये सहजच गेली होती. त्या ठिकाणी तिची टेस्ट घेण्यात आली आणि तिला दूरदर्शनमध्ये वृत्तनिवेदकाची संधीही मिळाली. त्यावेळी स्मिताचं वय अवघं १८ इतकं होतं. शाम बेनेगल कोणत्यातरी कामानिमित्ताने दूरदर्शनमध्ये आल्यानतंर त्यांनी स्मिताला पाहिलं आणि तिला चित्रपटाची ऑफर दिली. स्मिताचा चेहरा अत्यंत भावूक असल्याने 'चरणदास चोर' या चित्रपटात काम करण्याची संधी दिली. त्यानंतर त्यांनी निशांत या चित्रपटामध्ये पुन्हा एकदा संधी दिली.



स्मिताने तिच्या फिल्मी करियरमध्ये अनेक समांतर चित्रपट केले. अनेक चित्रपटांमध्ये तिने कणखर स्त्रीची भूमिका साकारली. यामागे तिच्या आईचा प्रभाव असल्याचं सांगितलं जातंय. स्मिताच्या आई विद्याताई पाटील या समाजसुधारक होत्या. आणि या गोष्टीचा स्मिताच्या आयुष्यावर इतका परिणाम झाला की 'उंबरठा' या मराठी चित्रपटात साकारलेली भूमिका ही स्मिताच्या आईचीच असल्याचं स्पष्ट होतंय.

स्मिताने सुनील दत्त यांनी निर्मित केलेल्या कँन्सरवर आधारित 'दर्द का रिश्ता' चित्रपटात केवळ एक रुपयाचं मानधन घेऊन काम केलं. तसेच अनेक चित्रपटांमध्ये समांतर भूमिका केल्या. या गोष्टी स्मिताच्या अंगभूत होत्या.

भूमिका चित्रपटासाठी स्मिताला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. या चित्रपटातील स्मिताच्या भूमिकेचे प्रचंड कौतुक करण्यात आलं. या चित्रपटानंतर स्मिता एक जबरदस्त अभिनेत्री असल्याचं स्पष्ट झालं. स्मिताने ज्या ज्या चित्रपटात काम केलं त्यामध्ये तिने अभिनेत्यांपेक्षा अधिक भाव खाल्ला.

चित्रपट सृष्टीमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल स्मिताला १९८५ साली पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. मंथन, भूमिका, आक्रोश, चक्र, निशांत, वारीस, अर्थ, मिर्च मसाला, आज, नजराणा या चित्रपटातील भूमिकांनी तिने रसिकांच्या मनावर वेगळीच छाप उमटवली. तसेच सामना, जैत रे जैत, राजा शिव छत्रपती, उंबरठा या सारख्या मराठी चित्रपटांमध्ये तिने आपल्या अभिनयाची उंची दाखवली.

काही लोक असे असतात की ते अत्यंत कमी काळात आपल्या कामाची छाप उमटवतात आणि या जगाचा निरोप घेतात. स्मितानेही अवघ्या ३१ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. पण तिच्या कामाने ती नेहमीच रसिकाच्या लक्षात राहिल हे नक्की.

**(साभार : मराठी एबीपीलाईव्ह)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : कोकण परिक्षेत्रीय वार्षिक पोलीस क्रीडा स्पर्धा कळंबोली येथील पोलीस मुख्यालयात सुरू झाली आहे. या स्पर्धेमध्ये नवी मुंबई, ठाणे ग्रामीण, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर असे सहा जिल्ह्यांचे संघ सहभागी झाले आहेत. विविध खेळ प्रकारांत ही स्पर्धा सुरू असून पोलीस कर्मचाऱ्यांच्या शारीरिक कसरती या ठिकाणी पहावयास मिळत आहेत.**

## आरोग्य प्रहर

# गाडीत उलटी टाळण्यासाठी प्रवासापूर्वी 'हे' पदार्थ खाणे टाळा

अनेक लोकांना प्रवासादरम्यान उलटी न होण्याची गोळी अथवा औषध घ्यावे लागते. हा त्रास बऱ्याच वेळेस खराब अन्नामुळे होतो किंवा प्रवास सुरू करण्यापूर्वी काही विशिष्ट पदार्थ खाल्यामुळे उलटी होते. कोणते असे पदार्थ खाल्यामुळे बेचैन वाटणे, मळमळ, उलटीचा त्रास होतो हे जाणून घेऊया. पुढल्या वेळेस प्रवासापूर्वी हे पदार्थ खाणे टाळा.



तुम्हाला केक, आईस्क्रीम असे पदार्थ जरी खूप आवडत असले तरी प्रवासापूर्वी हे पदार्थ खाणे टाळावे. खरंतर केक, आईस्क्रीम यासारख्या पदार्थांमध्ये ट्रान्स फॅटचे प्रमाण खूप जास्त असते, ज्यामुळे तुम्ही आजारी पडू शकता किंवा उलटी होऊ शकते.

बहुतांश व्यक्तींना दिवसाची सुरूवात चहा किंवा कॉफीने करायला आवडते. चहा– कॉफीमध्ये कॅफेन नावाचा घटक असतो, ज्यामुळे तुमची झोप तर उडते, फ्रेशही वाटते पण याच घटकामुळे तुम्हाला नर्व्हस किंवा बेचैनही वाटू शकते. तसेच त्यात दूध असते, ज्यामुळेही उलटीची भावना होऊ शकते.

जास्त तेल असलेले किंवा मसालेदार पदार्थांचे सेवन आपल्या आरोग्यासाठी चांगले नसते, हे तर आपल्या सर्वांनाच माहीत आहे. तसेच प्रवासापूर्वी तेलकट किंवा मसालेदार पदार्थ खाल्याने आपल्याला अस्वस्थ वाटू शकते. तेलकट पदार्थांमुळे डोकेदुखी अथवा चक्कर येण्याचा त्रास होतो, उलटीही होऊ शकते.

कोणताही प्रवास सुरू करण्यापूर्वी ब्रेड बटर किंवा ब्रेड सँडविच खाऊ नये. ब्रेड हा एक प्रक्रिया केलेला पदार्थ आहे. यामुळे तुमची एनर्जी लेव्हल झटक्यात तर वाढते पण तुम्हाला अस्वस्थही वाटू शकते.

अनेक लोकांना प्रवास सुरू करण्यापूर्वी फळांचा ज्यूस पिणं आवडतं. मात्र असं चुकूनही करू नका. फळांचा रस अथवा ज्यूस प्यायल्याने उलटीचा त्रास होऊ शकतो. खरंतर फळांमध्ये असलेल्या फायबरमुळे रक्तातील ग्लूकोजचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे आपली एनर्जी कमी होते. फळांचा ज्यूस प्यायल्यानवे तुम्हाल लगेच एनर्जेटिक वाटेल पण त्याच वेगाने तुमची एनर्जी कमीही होऊन उलटी होऊ शकते.

प्रवासापूर्वी काही खाऊन घेण्यावर भर देतात. सहज, सोपं आणि पटकन खाता येईल असे पदार्थ खायचा लोकांचा प्रयत्न असतो. तेव्हा ते पॅटीस किंवा एखादा तळलेला पदार्थ खाऊ शकतात. अशावेळी त्यासोबत सॉस किंवा केचअपही भरपूर खाल्ला जातो. मात्र त्यामध्ये असलेली अतिरिक्त साखर ही तुमच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते. या कृत्रिम साखरेमुळे चिंता आणि नैराश्य वाढू शकते. त्यामुळे केचअपचे सेवन टाळावे.

# हमी भावाने भात खरेदी केलीच पाहिजे

## भाजप किसान मोर्चाची मागणी, कर्जत तहसीलदारांना निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

शासनाच्या आधारभूत भात खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांच्या भाताची हमी भावाने खरेदी केलीच पाहिजे, अशी मागणी भाजप किसान मोर्चाकडून करण्यात आली. या मागणीचे निवेदन भाजप किसान मोर्चाच्या वतीने कर्जत तहसीलदारांना देण्यात आले.



कर्जत तालुक्यात शासनाची हमी भाव भात खरेदी केंद्रे सुरु झाली आहेत. मात्र केंद्रावर शेतकरी भात घेऊन गेले असता इ-पिकपाणी नोंद झाली असेल तरच भात खरेदी केले जाईल, असे सांगितले जात आहे. खरीप हंगामातील पिकांची नोंद इ-पीक पाहणी अहवालात झालेली नाही किंवा पाहणी अहवाल होऊनदेखील सातबारा उताऱ्यावर त्यांची नोंद झाली नाही. अशा शेतकऱ्यांचे भात खरेदी केंद्रावर आधारभूत तत्वावर घेतले जात नाही. त्यामुळे भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाच्या वतीने कर्जतचे तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांना निवेदन देण्यात आले. या वेळी भाजप किसान मोर्चाचे कोकण संपर्क प्रमुख सुनील गोगटे, तालुका अध्यक्ष शिरीष कदम, माजी तालुका उपाध्यक्ष रमेश अहिर, सूर्यकांत गुप्ता, हरिश्चंद्र मांडे आदी उपस्थित होते.

# सुधागडात बाळासाहेबांच्या शिवसेनेचा वरचष्मा

## चिवे व खांडपोली ग्रामपंचायतीवर मिळवली सत्ता





**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात होऊ घातलेल्या १४ ग्रामपंचायतीची निवडणूक अटीतटीची व चुरशीची होताना पहावयास मिळत आहे. विशेष बाब म्हणजे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाने या ग्रामपंचायत निवडणुकीत आपला करिष्मा दाखवून दिला आहे. चिवे व खांडपोली या दोन ग्रामपंचायतीवर सत्ता प्रस्थापित केल्याने सुधागड तालुक्यात बाळासाहेबांच्या शिवसेनेचा वरचष्मा दिसत आहे.

चिवे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी रोहिदास साजेकर यांची तर सदस्य पदी नागेश साजेकर, अंजना वाघमारे, रंजना पवार आदिंची बिनविरोध निवड झाली आहे. खांडपोली ग्रामपंचायतीमध्ये भाजप-बाळासाहेबांची शिवसेना युतीच्या सरपंच मानसी निलेश पालांडे, सदस्य स्वाती समीर परब, सदस्य जितेंद्र यशवंत डाकी हे बिनविरोध निवडून आले आहेत.

चिवे ग्रामपंचायतीवर बाळासाहेबांची शिवसेनेचा भगवा झेंडा फडकवण्यासाठी माजी जि. प सदस्य तथा सुधागड तालुका प्रमुख रवींद्र देशमुख, उपजिल्हाप्रमुख अनुपम कुलकर्णी, रायगड जिल्हा युवासेना प्रमुख संजय म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हभप नथुराम महाराज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत हद्दीतील कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

# खोपोली एसटी स्थानकाकडे परिवहन विभागाचे दुर्लक्ष

**खोपोली : प्रतिनिधी**

द्रुतगती मार्ग निर्मितीपूर्वी कर्जत एसटी आगार अंतर्गत असलेल्या खोपोली बस स्थानकाचे अनोखे वैभव होते. द्रुतगती मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर या स्थानकाचे वैभव हळूहळू लयास गेले आहे. लांब पल्ल्याच्या बहुसंख्य एसटी गाड्या द्रुतगती मार्गावरून थेट लोणावळ्याला जात असल्याने खोपोली बस स्थानकाची दुरवस्था झाली आहे. अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेली एसटी कॅन्टीग व अन्य सुविधा मोडकळीस आल्या असून, येथील निवाराशेड, स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी अशा अनेक सुविधांबाबत परिवहन विभागाचे सतत दुर्लक्ष होत आहे.

पाच वर्षापूर्वी खोपोली एसटी स्थानकांच्या नुतनीकरणाचे काम मंजूर झाले. त्यात स्थानक परिसराचे कॉक्रिटीकरण, नवीन निवारा शेड, पिण्याच्या पाण्याची कायम स्वरूपी व्यवस्था, नवीन आसन व्यवस्था व पंखे आदी कामांचा समावेश होता, मात्र चार वर्ष उलटले तरी या स्थानकांत कॉक्रीटीकरणाचे काम सोडले तर प्रवाशांच्या समस्या कमी होतील, या बाबतीत कोणतेही कामें झाली नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. तुटलेली आसन व्यवस्था, बंद अवस्थेतील पंखे, निखळलेली निवारा शेड , पिण्याच्या पाण्याची गैरसोय, परिसरात सदैव कचरा व स्वच्छता, गृहामधील अस्वच्छता आदि समस्या खोपोली एसटी स्थानकांत आजही कायम आहेत. याबाबत खोपोली प्रवासी संघटना, विविध सामाजिक संस्था सतत आवाज उठवत असूनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसत आहे. मागील सरकारने या स्थानकाकडे दुर्लक्ष केल्याने विद्यमान शासनाने तरी लक्ष घालावे, अशी मागणी प्रवाशांकना होत आहे.

**समस्या : खोपोली एसटी स्थानकात एसटी कॅन्टीन बंद असल्याने विकतचे पाण्याशिवाय येथे पिण्याच्या पाण्याची कोणतीही सुविधा अस्तित्वात नाही. एसटी स्थानकातील मोठा भाग जणू खासगी गाड्यांच्या पार्किंगसाठी आरक्षीत असल्याची येथील स्थिती बनली आहे.**

***वर्तमान स्थितीत पेण, मुरुड, अलिबाग, मुंबई येथून पुणे, नगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापुरकडे जाणाऱ्या पन्नास टक्क्याहून अधिक गाड्या द्रुतगती मार्गावरून थेट लोणावळा येते जातात. अनेक गाड्यांना खोपोली मार्गे मार्ग दिला असूनही चालक व वाहक खोपोलीसाठी थांबा नाही, असे सांगून प्रवाशांना बसण्यास मनाई करण्याचा अनुभव पनवेल स्थानकांत बसताना प्रवाशांना येतो.***



### बस स्थानकातील एकूण फेऱ्या

रायगड जिल्हा अंतर्गत : ११७

पुण्याकडे : ७०

मुंबई व ठाण्याकडे : ४५

सर्वात नफा देणाऱ्या फेऱ्या : पनवेल, पाली, पेण व कर्जत

**खोपोली हे मुंबई-पुणे यांना जोडणारे महत्वपूर्ण शहर आहे. औद्योगीकरण, विविध शैक्षणिक सुविधा, खासगी व्यवसायामुळे शहराचे नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. खोपोलीत रोज हजारो प्रवाशी दैनदिन कामकाज तर विद्यार्थी शिक्षणासाठी एसटीने येतात. या स्थानकांतील विविध गैरसोयीं व प्रवाशांच्या समस्यांबाबत लवकरच परिवहन मंडळ महाव्यवस्थापक व मंत्री स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल.**

**-महेंद्र थोरवे, आमदार**

**निवारा शेड दुरुस्ती, आसन व्यवस्था, नवीन पंखे याबाबतचा प्रस्ताव कर्जत आगरामार्फत वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात आला आहे. स्वच्छतागृहात मुबलक पाण्याची सोय उपलब्ध असून, बस स्थानक व स्वच्छतागृहाची स्वच्छता ठेवण्यासाठी ठेकेदार नेमला आहे.**

**-मनोज फडके, वाहतूक नियंत्रक, खोपोली बसस्थानक**

# पालीत धुळीचे साम्राज्य; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहरात सर्वत्र धुळीचे साम्राज्य आहे. त्यामुळे पालीची ओळख धुळीचे शहर म्हणून होत आहे. प्रदूषित हवेमुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. मात्र या धुळीकडे नगर पंचायत मुख्याधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



खराब रस्ते, कासव गतीने सुरू असलेली रस्त्यांची कामे, शहरातून होत असलेल्या अवजड वाहतूकीकडे पोलीस व नगरपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्यामुळे पाली शहरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असल्याचा आरोप नागरिकातून होत आहे. धुळीमुळे श्वसनाचे विकार, ॲलर्जी, खोकला, कफ, धाप, सर्दी, घशात दुखणे अशा त्रासाला पालीतील नागरिक सामोरे जात आहेत. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पाली शहरात धुळीच्या साम्राज्यामुळे विशेषत: ज्येष्ठ नागरिकांमध्ये श्वसनाचे विकार मोठ्या प्रमाणात वाढले आहे तसेच लहान बालकांना धुळीचा त्रास होत आहे. याकडे नगरपंचायतीने लक्ष देवून रस्त्यांवर पाण्याची फवारणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**पाली शहरातील रस्त्यांची कामे मंद गतीने सुरू आहेत. त्यामुळे शहरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या धुळीमुळे नागरिक प्रमुख्याने श्वसन विकाराने त्रस्त आहेत. नगरपंचायतीने त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.**

**-ॲड. नरेश शिंदे, ग्रामस्थ, पाली, ता. सुधागड**

# पेणमध्ये जावयाकडून सासूवर कोयत्याने हल्ला

**पेण : प्रतिनिधी**

माहेरी आलेल्या पत्नीला घरी घेऊन जाण्यास आलेल्या जावयाने शनिवारी (दि. १०) रात्री सासूच्या हातावर कोयत्याने हल्ला केल्याची घटना पेणमधील फणसडोंगरी येथे घडली आहे.

पदी ढुंमणा असे हल्ला झालेल्या सासूचे नाव असून, त्या फणसडोंगरी गोळीबार मैदान येथे राहतात. त्यांची मुलगी नवऱ्यावरील संशयाच्या कारणावरून आपल्या लहान मुलासोबत माहेरी आली होती. शनिवार रात्री तिचा आरोपी पती (रा. गणपतीवाडी, पो. आंबेघर, ता. पेण) त्या ठिकाणी जावुन आपल्या बायकोला तु येणार आहेस की, नाही, असे म्हणाला. त्यावेळी पदी ढुंमणा म्हणाल्या की, तिला कुठे नेता. या गोष्टीचा राग येऊन आरोपीने सासू पदी ढुंमणा यांना शिवीगाळी करत हाताबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर उजव्या हातावर कोयत्याने हल्ला करुन दुखापत केली. तसेच आरोपीने स्वत:च्या हातापायावर कोयत्याने मारहाण करुन घेतली.

या प्रकरणी पदी ढुंमणा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार रामदास सूर्यवंशी हे करीत आहेत.

# मुरूडमधील रेशनधारकांना सर्व्हर डाऊनचा फटका

## पॉस मशीन मंदगतीने चालत असल्याने नागरिक हैराण



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरासह ग्रामीण भागातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या पॉस मशीनचे सर्व्हर फार धीम्या गतीने सुरू होत असल्याने रेशनधारकांना धान्य मिळण्यास विलंब होत आहे. नेटवर्क मिळत नसल्याने मुरूड तालुक्यातील धान्य वितरण व्यवस्था पार कोलमडली आहे. त्याचा फटका रेशनकार्डधारकांना मोठ्या प्रमाणात बसत आहे.

शासनाने सर्व रेशन कार्डाची नोंदणी पॉस मशीनमध्ये आरसी नंबर केली आहे. आधार क्रमांकानुसार नोंद करून घेतली आहे. या सर्व मशीन एका लहान अँटिनाद्वारे ऑनलाइन सर्व्हरने जोडलेल्या असतात. मागील काही दिवसापासून नेटवर्क नसल्याने सर्व्हर डाऊन होत असल्याने धान्य वाटपाचे काम फार धीम्या गतीने सुरु आहे.

मुरूड तालुक्याच्या ग्रामीण भागात एकूण २८ तर शहरात चार रेशन दुकाने आहेत. सर्व्हरच डाऊन असल्यामुळे पॉस मशीनद्वारे जलद काम होत नाही. किमान एका ग्राहकाला धान्य घेण्यासाठी ३० मिनिटापेक्षा अधिक वेळ लागत आहे. त्यामुळे स्वस्त दुकानातील गर्दी वाढत आहे.

दरम्यान, मुरूडमधील रेशनिंग दुकानदारांनी ऑफ लाईन पद्धतीने कामकाज पूर्ण करण्याची विनंती केली होती. परंतु ती न स्वीकारल्यामुळे धीम्या नेटवर्कमुळे धान्य वाटपास उशीर होत आहे.


### पनवेल महानगरपालिका
### प्रथम जाहीर निविदा सुचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील वृक्षांचे वय निर्धारीत करणेकामी वृक्षाच्या मुल्यांकनाचा अनुभव असणाऱ्या क्षेत्रातील व्यक्ती यांची नेमणूक करणेबाबत पात्र व इच्छुक व्यक्ती यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

सदरकामी कोरी निविदा कार्यालयीन वेळेत दि. १३/१२/२०२२ ते दि. २१/१२/२०२२ पर्यंत मिळतील. सदरच्या निविदा दि. २१/१२/२०२२ दुपारी ०३:०० पर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. निविदेबाबत अटी व शर्ती व इतर सर्व माहिती कार्यालयीन वेळेत वृक्ष प्राधिकरण विभागात पहावयास मिळतील.

जा.क्र. पमपा/ उद्यान/९९२२/प्र.क्र.१३/७२८/२०२२
दिनांक ०९/१२/२०२२

सही/-
(प्रशांत रसाळ)
अति.आयुक्त-(I)
पनवेल महानगरपालिका



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११(२) व नियम (२) अन्वये**

### जाहीर नोटीस

चेअरमन/सेक्रेटरी
पार्थ सॉलिटेअर को. ऑप. हौ. सो. लि.
भूखंड क्र. ०२. सेक्टर ०९ ई.
कळंबोली. नवी मुंबई
} अर्जदार

**विरुध्द**

१) मेसर्स पार्थ रेसिडेन्सी तर्फे प्रो. प्रा.
श्री. धर्मेंद्र एम. पारीख
पत्ता - ए / ०२. श्रुती बिल्डींग,
यशोधन नगर, गोरेगांव पुर्व
मुंबई ४०० ०६३
} जाब देणार

२) मा. व्यवस्थापक (शहर सेवा) १.
सिडको लि. सिडको भवन पहिला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

पार्थ सॉलिटेअर को ऑप हौ. सो. लि. भूखंड क्र. ०२, सेक्टर ०९ ई, कळंबोली, नवी मुंबई या संस्थेचा दिनांक २२/११/२०२२ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज.

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.
२) जाब देणार यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीश: किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.
३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी दिनांक **२७/१२/२०२२ रोजी दुपारी ०२:०० वाजता** निश्चित करण्यात येत आहे.
४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर सदर प्रकरणाची सुनावणी घेवून उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
५) आपणास सुनावणीचे वेळी पुर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.
६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्यावतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.

दि. १२/१२/२०२२

**सही/-**
**(संगिता र. डोंगरे)**
**सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई**

लक्षवेध :- अर्जदार यांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत नोटीस संबंधिताना बजावून त्याची पोहोच पावती सुनावणीपुर्वी या कार्यालयास सादर करावी. अर्जदार अथवा जाब देणार यांना नोटीस प्राप्त न झाल्याचे कारण देवून भविष्यात न्यायालयात प्रकरण दाखल केल्यास नोटीस प्राप्त न झाल्याच्या प्रकरणी संबंधित अर्जदार यांना जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.



### कागदपत्रे हरविलेबाबत नोटीस

मी संगिता प्रकाश कांडपाळ, रुम नं. २०२/ए, शिवसागर सोसा, से. ९, ता. पनवेल, जि. रायगड, खांदेश्वर, नवी मुंबई, महाराष्ट्र, भारत.

माझे शेअर्स सर्टिफिकेट ०६/१२/२०२२ रोजी १३.०० वाजताचे सुमारास नवीन पनवेल परिसरात प्रवासादरम्यान कोठेतरी पडून गहाळ झाले आहे. त्याबाबत मी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मिसींग रजि. नं. १९८८/२०२२ दि. ११/१२/२०२२ रोजी नोंद केलेली आहे.

**हरविलेली कागदपत्रे- सदनिकेचे शेअर्स सर्टिफिकेट**

सदरचे शेअर्स सर्टिफिकेट जर कुणाला सापडले असल्यास कृपया खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सही/-**
**संगिता प्रकाश कांडपाळ**
**मो. नं. ९८६७१९२६४६**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### EXTENSION TO E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fees:** Rs. 500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000025362** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-50/2022-2023 Extension to Providing and fixing of rain guard for Buchholz Relay and PRVs at various substations under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 3,03,723/- **EMD Amount:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 13.12.2022, 17:00 Hrs to 20.12.2022, 23:59 Hrs |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 20.12.2022 up to 23:59 Hrs |
| 4 | Online Opening of the Techno Commercial RFx | 21.12.2022 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer (I/C)**
**E.H.V. (O&M) Dn., Panvel**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### EXTENSION TO E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.
**Tender Fees:** Rs. 500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000025353** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-49/2022-2023. Extension to Providing and installation of LED Panel Light for false ceiling at 100 KV Taloja substation and Panvel Division Office under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 2,57,468/- **EMD Amount:** Rs. 5,000/-. |
| 2 | Online Downloading of the RFx | 13.12.2022, 17:00 Hrs to 20.12.2022, 23:59 Hrs |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 20.12.2022 up to 23:59 Hrs |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 21.12.2022 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer (I/C)**
**E.H.V. (O&M) Dn., Panvel**

# नवी मुंबईत पर्यावरणपूरक विकासकामांना गती

## केंद्राच्या अमृत योजनेतून मिळणार पाठबळ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरासभोवतालची जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरण सुलभतेकरिता महापालिकेने सादर केलेल्या ३११ कोटींच्या कामांना राज्य सरकारने हिरवा कंदील दर्शवला आहे. या योजनेंतर्गत विविध कामांना अनुदान मिळण्यासाठी राज्यमंत्री मंडळाची नुकतीच बैठक झाली होती. या बैठकीत नवी मुंबई महापालिकेच्या २८ पैकी १० कामांना मंत्री मंडळाने परवानगी दिल्याने पर्यावरणपूरक विकासकामांना अमृत योजनेतून पाठबळ मिळणार आहे.

नवी मुंबई शहराची १९७०च्या दशकात सिडकोने जमीन संपादन करून नेदरलँडच्या धर्तीवर विकास केला. समुद्राच्या भरतीचे पाणी शहरात येऊ नये म्हणून धारण तलाव करून भलीमोठी पंपिंग स्टेशन यंत्रणा बसवली. बेलापूर, नेरूळ, तुर्भे, वाशी आणि कोपरखैरणे या भागात धारण तलावांमध्ये पंप बसवण्यात आले. ३५ वर्षांपूर्वी सिडकोने बसवलेली ही सर्व यंत्रणा जुनी झाल्याने क्षमता कमी झाली आहे. अशा परिस्थितीत शहराला पुन्हा समुद्राच्या आणि पुराच्या पाण्याचा धोका निर्माण होऊ नये म्हणून ही सर्व यंत्रणा बदलण्याची गरज महापालिकेने व्यक्त केली आहे.

यानुसार महापालिकेने सादर केलेल्या या पाचही ठिकाणच्या धारण तलावांचे पंपिंग स्टेशन बदलून नव्याने यंत्रणा बसवण्याच्या कामाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यानुसार बेलापूर सेक्टर २० आणि २५ येथील धारण तलावांवर बांधकाम करून सेक्टर ६ येथे नवीन पंप बसवण्यात येणार आहे. शिरवणे नेरूळ सेक्टर १ ए येथे पंपिंग स्टेशनचे बांधकाम व नेरूळ सेक्टर ४ येथे जुने पंप काढून नवीन पंप बसवण्यात येणार आहे. सानपाडा सेक्टर ९ येथे नवीन बांधकाम व वाशी सेक्टर ३० येथे नवीन पंप बसवण्यात येणार आहे. तसेच वाशी सेक्टर ३, १२ आणि २८ येथे पंपिंग स्टेशनचे बांधकाम केले जाणार आहे. कोपरखैरणे सेक्टर १ ए आणि २ ए येथे पंपिंग स्टेशनचे बांधकाम केले जाणार आहे. केंद्र सरकारच्या या योजनेतून राज्य व केंद्र सरकार अनुदान देणार आहे. उर्वरित खर्च महापालिकेला स्वतः च्या तिजोरीतून करावा लागणार आहे.

**महापालिकेतर्फे अमृत योजनेतून मोठ्या प्रमाणात कामे होणार आहेत. ही सर्व कामे २०५५ पर्यंत महापालिकेला सेवा देतील, अशी रचना करण्यात आली आहे.**

**–संजय देसाई, शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका**

### ऐरोलीतील सांडपाणी शुद्धीकरणासाठी प्रकल्प

*ऐरोली येथील यादवनगर परिसरात महापालिकेतर्फे नवे मलनिस्सारण केंद्र तयार केले जाणार आहे. या परिसरातील सांडपाणी खाडीपात्रात शुद्ध करून सोडण्यासाठी दोन एमएलडी इतक्या क्षमतेचे हे केंद्र तयार केले जाणार आहे; तर सीबीडी–बेलापूर येथे नवे प्रक्रियाकृत सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे १० एमएलडी क्षमतेचे टर्शरी ट्रीटमेंट प्लांट तयार केले जाणार आहे. या केंद्रातून बेलापूर परीसरातील उद्यान, रस्त्याच्या दुभाजकांवरील झाडे, हरितपट्टे, वाहन धुण्यासाठी महापालिकेला पाणी उपलब्ध होणार आहे.*

### बेलापूरला २४ तास पाणीपुरवठा

*बेलापूर शहराला २४ तास पाणीपुरवठा देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल महापालिकेने उभारले आहे. या नोडला धरणाहून कळंबोली मार्गे शहरातील पंपिंग स्टेशनला येणारी जलवाहिनी जुनी आणि जीर्ण झाली आहे. साधारणः ३७ वर्षांपूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने टाकलेली वाहिनी बदलण्यासोबतच तळोजा खाडीपूलावर एक पूल तयार केला जाणार आहे. बेलापूरमध्ये आलेले पाणी घरोघरी उच्च दाबाने पुरवठा करण्यासाठी ३१ किलो मीटर अंतराची नवीन जलवाहिन्यांचे जाळे निर्माण केले जाणार आहे.*

# भूमिपुत्र ठेकेदारांना न्याय मिळवून देण्यासाठी तीव्र आंदोलन –भगत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या स्थापनेपासून शहर विकासात योगदान देणाऱ्या स्थानिक व भूमिपुत्र ठेकेदारांनी अधिक नफ्याची अपेक्षा न ठेवता मनपाची नागरी विकास कामे करताना हजारो अवलंबितांना रोजगार दिले आहेत, मात्र या ठेकेदारांकडे केवळ भांडवलदार अथवा व्यवसायिक म्हणून काही अधिकारी पाहत आहेत. याउलट याच अधिकाऱ्यांनी स्वतःचे घर भरण्यासाठी शहराबाहेरील मर्जीतील घटकांना टेंडर देऊन व प्रसंगी भागीदारी तत्वावर मोठा गोरखधंदा मांडलेला आहे. या काही प्रतिनियुक्ती अधिकाऱ्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करणार असल्याचे माजी विरोधी नेते दशरथ भगत यांनी सांगितले आहे.



स्थानिक व भूमिपुत्र ठेकेदारावर यांच्याकडे असलेली यांत्रिक व साधन सामुग्री बंद असल्यामुळे त्यांचे बँकेचे हप्ते न भरणे व त्यांच्याकडील कुशल, तंत्रज्ञ, कार्यालयीन तसेच प्रामुख्याने मजूर वर्गाला उपाशीपोटी ठेवण्याची नामुष्की ओढवली आहे. नवी मुंबई पालिकेच्या वातानुकूलित इमारतीत बसलेल्या प्रतिनियुक्तीवर आलेल्या काही अधिकाऱ्यांवर असलेल्या वरिष्ठांच्या वरदहस्तामुळे शहरातील करदात्या सर्वसामान्य नागरिकांना व व्यावसायिक दुकानदारांनी कर रूपाने दिलेल्या महलूलाची अक्षरशः नागरी विकासकामांच्या नावाखाली दर्जाहीन कामे करून मनपाच्या तिजोरीतील जनतेच्या पैशांची विल्हेवाट लावली जात असल्याचे दिसून येत आहे. याविरोधात आता महापालिकेचे पिढीत ठेकेदार व उपजीविका धारकही काही प्रतिनियुक्ती अधिकाऱ्यांच्या विरोधात मैदानात उतरले असून प्रथम सनदशीर मार्गाने आंदोलन तीव्र करणार असल्याचे भगत यांनी सांगितले आहे.

या वेळी बोलताना दशरथ भगत यांनी सांगितले की, नवी मुंबई शहराशी व स्थानिक नागरिकांशी कोणत्याही प्रकारची बांधिलकी नसलेल्या व काही काळासाठी प्रतिनियुक्तीवर शहरात आलेल्या भ्रष्ट व षड्यंत्री अधिकाऱ्यांच्या मानसिकतेमुळे शहरातील लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक घटक, प्रशासकीय घटक, पालिकेतील कायम अधिकारी व कर्मचारी वर्ग हे हतबल झाले आहेत. विशिष्ट प्रकारच्या अनावश्यक व अशक्य अटींचा अंतर्भाव करून विविध कामांच्या निविदा बनवायच्या ज्याचा प्रत्यक्ष कामाशी काहीही संबन्ध नसतो, अशा प्रकारच्या षडयंत्री डावामुळे आपल्याच मर्जीतील शहराबाहेरील ठेकेदारांना व स्वतःला भागीदारीत काम मिळेल याची तजवीज या अधिकाऱ्यांकडून काळजीपूर्वक घेतली जात आहे.

या कारभाराच्या विरोधात डोळ्यांदेखत होत असलेली लूट व अनेकांचे रोजगार उधळून लावणाऱ्या घटकांच्या विरोधात नवी मुंबईतील स्थानिक व भूमिपुत्र ठेकेदारांच्या असोसिएशनच्या वतीने माजी नगरसेवक विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या समनव्यातुन नुकत्याच झालेल्यार नवी मुंबई बचाव परिषदेत माजी मंत्री व आमदार गणेश नाईक यांच्या उपस्थितीत आर्जव विनंतीपर विविध ४६ मागण्या केल्या आहेत.

दरम्यान, परिषदेच्या माध्यमातून नवी मुंबईतील स्थानिक व भूमिपुत्र ठेकेदार एकवटले असून यांच्या संघर्षास नवी मुंबईतील सर्वपक्षीय माजी लोकप्रतिनिधी, महापालिकेतील कायम सेवेतील त्रस्त अधिकारी आणि जागरूक नागरिक जाहीर पाठिंबा देण्यासाठी सरसावले असून हा लढा आता तीव्र होणार आहे.

## निवडक

### महिलेच्या बॅगमधून दागिने लांबविले

**पनवेल :** बस स्थानकांत प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या बॅकमधून सोन्याचे दागिने अज्ञात व्यक्तीने चोरल्याची घटना घडली आहे. दिपाली पाटील (वय २७) यांच्या ताब्यातील बॅकमधून जवळपास २१ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीचा इराद्याने चोरून नेले आहेत. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दरम्यान, गेल्या दोन दिवसांमध्ये दागिने चोरीच्या घटना वाढल्या आहेत.

### मोटरसायकलीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन येथील डाव्या बाजूच्या पार्किंगच्या बाहेर रस्ताच्या बाजूस उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आट्. भूषण तरे (वय ३१, रा. उसर्ली) यांनी त्याची २० हजार रुपये किमतीची निळ्या रंगाची पल्सर मोटसायकल (एमएच ०२ डीएल –५३०५) ही पनवेल रेल्वे स्टेशन येथील डाव्या बाजूच्या पार्किंगच्या बाहेर रस्ताच्या बाजूस उभी करून ठेवली होती. याच वेळी अज्ञात चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ऐरोली खाडीकिनारी स्वच्छता अभियान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेकडून स्वच्छ भारत अभियान २०२३ अंतर्गत ऐरोली विभाग कार्यालय आणि निर्धार फांऊडेशन यांच्या वतीने स्वचछता अभियान राबविण्यात आले. या अभियानात एक क्विंटल सुका कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आला.

आशिया खंडातील सर्वांत मोठी खाडी म्हणून ठाण्याची खाडी ओळखली जाते. या खाडीकिनारी परिसरात मोठ्या प्रमाणात कांदळवन क्षेत्र आहे. या कांदळवनाचा ऱ्हास थांबवण्यात कांदळवन क्षेत्राला यश आले आहे, मात्र तरीही खाडीमध्ये कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता सांडपाणी सोडण्यात येते. त्यानंतर खाडीतला कचरा समुद्रात वाहून जाताना तो कांदळवनात अडकतो. यामुळे कांदळवनांचा श्वास गुदमरत आहे. यात झाडांची मुळे झाकली जातात. मुळांवर कचरा जमा झाला की, ऑक्सिजनची मात्रा कमी होते. या सर्व गोष्टींचा विचार करून ऐरोली विभागाकडून स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आली. यासाठी ऐरोली खाडी परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या अभियानातून ऐरोली खाडी परिसरात एक क्विंटल ओला व सुका कचरा आणि प्लास्टिक गोळा करण्यात आले, अशी माहिती सहायक आयुक्त तथा विभाग अधिकारी महेंद्र संप्रे यांनी दिली.

## फुटपाथवर बेकायदा खाद्यपदार्थांची विक्री

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील कारंजाडे वडघर रोड वर कॉलेज फाटा येथील फुटपाथवर बेकायदेशीर उघडयावर बिर्याणी विक्री करण्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

मोहम्मद साबेरूल मंजूर आलम (वय ३६) याने चिकन बिर्याणी विक्रीसाठी फुटपाथवर टेबल लावून त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून ज्वालाग्राही साहित्याचा हयगयीने वापर करून मानवी जीवास धोका निर्माण केल्याचे मिळून आले. त्यामुळे मोहम्मद साबेरूल मंजूर आलमच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांत अशा अनेक कारवाया करण्यात आल्या आहेत.

## तुर्भे येथे एक टनहून अधिक प्लास्टिक साठा जप्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ सर्वेक्षण २०२३च्या अनुषंगाने नवी मुंबई शहरात प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिम राबविण्यात येत आहे. अशाच प्रकारे तुर्भे येथे एक धडाकेबाज मोहीमेत प्लास्टिकचा वापर करणाऱ्या तीन विक्रेत्यांवर धडक कारवाई करून त्यांच्याकडील प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले.



साधारण एक टन २०० किलो प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला आहे. ही जप्त करण्यात आला आहे. तसेच पहिल्यांदा गुन्हा असल्याने त्यांच्याकडून प्रत्येकी पाच हजार रुपये याप्रमाणे एकूण १५ हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली.

तुर्भे से १८ येथील महावीर मार्केट येथील साईपूजा प्लास्टिक येथील गोडाऊनवर धाड घालत तब्बल १२०० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा माल जप्त करण्यात आला. यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. या व्यावसायिकाकडून यापूर्वीही प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापराचा गुन्हा घडला आहे. हा दुसऱ्यांदा गुन्हा झाला असल्याने त्याच्यांकडून १० हजार रुपये दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आले आहे.

# खांदा कॉलनीत रक्तदान शिबिर

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि कै. वामनराव ओक रक्तकेंद्र ठाणे यांचे संयुक्त प्रयत्नाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शनि मंदिर, सेक्टर १ खांदा कॉलनी येथे हे शिबिर झाले.



फिनिक्स आणि सुश्रुत मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलचे विख्यात डॉ. श्रीराम रघुनाथ नावडे यानी संघाच्या परंपरेनुसार स्वतः रक्तदान करून शिबिराचे उद्घाटन केले. कै.वामनराव ओक रक्तकेंद्र ठाणे या संस्थेचे सुरेंद्र बेलवलकर यांनी या शिबिराचे प्रयोजन विषद करताना 'थॅलेसेमिय' या आजाराबाबत मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतामध्ये त्यानी थॅलेसेमियाची लग्नाअगोदर तपासणी अनिवार्य व्हावी असा विचार व्यक्त केला. याचे कारण सांगताना ते म्हणाले, आई वडिल दोघेही थॅलेसेमिया मायनर असतील तर जन्माला येणारे अपत्य थॅलेसेमिया मेजर असते. अशा अपत्यामध्ये स्वतः चे रक्त तयार करण्याची प्रक्रीया पूर्ण होत नाही. त्यास पहिल्या दिवसापासुन रक्ताची गरज भासु लागते. वाढत्या वयानुसार ही गरज वाढू लागते. हा खर्च खुप मोठ्या प्रमाणात त्या परिवारास सहन करावा लागतो.

शासनाच्या नियमानुसार अशा रुग्णास 'मोफत रक्तपुरवठा करावा' असे आदेश आहेत. अशा रुग्णास कै. वामनराव ओक रक्तकेंद्र मोफत रक्तपुरवठा प्राधान्याने करते. थॅलेसेमिया चाचणी कै. वामनराव ओक रक्तकेंद्र मोफत करत असुन, मुरबाड तालुक्यातील काही गावांमध्ये तपासणी करताना दर तीन हजार तपासणी मागे पंचवीस रूग्ण थॅलेसेमिया मायनर असल्याचे निरीक्षण त्यांनी नमुद केले. पूर्वी एकाच गोत्रातील परिवारात लग्न करत नव्हते. 'थॅलेसेमिया' हा शब्द त्या वेळी प्रचलीत नसेल परंतु पुर्वजांचा दृष्टीकोन तोच असावा याकडे बेलवलकर यांनी लक्ष वेधुन घेतले.

तरुणी व महिलांसह पासष्ठ जणांनी रक्तदान केले. कृष्णा रुक्मिणी ट्रस्टचे अध्यक्ष, डॉ. कृष्णा देसाई, शनि मंदिर ट्रस्टी शिवाजी थोरवे, रक्तकेंद्राचे कर्मचारी, संघाचे स्वयंसेवक आदींनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे परिश्रम घेतले.

# 'रयत'च्या विभागीय स्पर्धांमध्ये गव्हाण विद्यालयाची यशस्वी कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसाचे औचित्य साधून संस्थेच्या रायगड विभागाने 'कृतज्ञता सप्ताह' आयोजित केला असून या उपक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे शाळा गटनिहाय आणि नंतर विभागीय पातळीवर आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धांमध्ये गव्हाण विद्यालयाच्या यशाचा वारू चौफेर उधळला असून वक्तृत्व, निबंध, कला, विज्ञाना सोबतच सांस्कृतिक कार्यक्रमात आणि वैयक्तिक व सांघिक मैदानी खेळांतही गव्हाणच्या विद्यार्थ्यांनी देदिप्यमान यश संपादन केले.

संस्थेच्या कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या भव्य प्रांगणात संपन्न झालेल्या विभाग स्तरावरील सांस्कृतिक कार्यक्रमांच्या स्पर्धेत गव्हाण विद्यालयाच्या २३ विद्यार्थ्यांच्या समूहाने सादर केलेल्या 'महाराष्ट्राची लोकधारा' या शृंखलेतील विविध सणांवर आधारीत नृत्याविष्काराने शेकडो रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली. कधी लालित्यपूर्ण पदन्यास तर कधी ठसकेबाज अदाकारी सोबतच अंगिक व मुद्राभिनयाचा सहजसुंदर मिलाफ यांमुळे रसिक प्रेक्षकांसह परीक्षकांच्याही पसंतीस उतरलेल्या या नृत्याविष्कारास विभाग स्तरावरचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या गीताचे नृत्यदिग्दर्शन साई मोकल यांनी केले. तर सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर, चारुशीला ठाकूर व सागर रंधवे यांचेही सहकार्य स्फूर्तीदायक ठरले. त्यास प्रा. राजेंद्र चौधरी, सुजाता शेलार–चौधरी, सुयशा पाटील यांचे सहकार्य लाभले.

प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या सर्व प्रकारातील विजेत्या स्पर्धकांचा सन्मान वाशी येथे विष्णुदास भावे नाट्यगृहात होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात १६ डिसेंबर २०२२ रोजी होणार आहे.

गव्हाण शाखेतील चौफेर यशामुळे सर्वत्र शाखेचे तसेच विद्यार्थ्यी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक होत आहे. विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते यांचे मार्गदर्शनही प्रेरक ठरले. क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर आणि संदीप भोईर भोईर यांच्या अथक प्रयत्नांनामुळे यशाला गवसणी घालता आली.

छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांचा या विभागीय स्पर्धांमधील यशस्वी वारू असा चौफेर उधळलेला आहे. या विभागीय स्पर्धांमध्ये मधील सर्व प्रकारांच्या स्पर्धेतील यशाबद्दल विद्यालयाचे आधारस्तंभ रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत, शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, सहायक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर आदींनी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले.

# इंदापूर संघ एमपीएलचा मानकरी





(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण माणगाव तालुक्याचे लक्ष वेधून घेतलेल्या माणगाव प्रीमिअर लीगच्या दुसऱ्या पर्वाचे विजेतेपद आर. व्ही. फायटर इंदापूर संघाने पटकाविले. त्यांनी अंतिम सामन्यात गतविजेत्या श्री गणेश स्पोर्ट्स घोटवळ संघाचा पराभव केला.

निळगुण फाटा येथील अल्ताफ धनसे यांच्या भव्य मैदानावर सात दिवस एमपीएल रंगली. तृतीय क्रमांक शिवांश धियांश उतेखोल, चतुर्थ विवा स्पोर्ट्स माणगाव आणि पाचवा के. सरकार सुपरस्टार लोणेरे आणि सहावा क्रमांक रॅपीडो मोर्बा संघाने प्राप्त केला. विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

वैयक्तिक बक्षिसांमध्ये मालिकावीर शुभम जाधव (उतेखोल), उत्कृष्ट फलंदाज योगेश पवार (इंदापूर), उत्कृष्ट गोलंदाज आर. व्ही. फायटर (लोणेरे) यांची निवड करण्यात आली. त्यांनाही पारितोषिके देण्यात आली.

बक्षीस वितरण समारंभास संजय कदम, एमपीएलचे कार्याध्यक्ष दीपक जाधव, संतोष खडतर, उद्योजक सुभाष दळवी, गोरेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक श्रीकृष्ण नावले, अनिल मोरे, प्रताप घोसाळकर, राजू पाटील, गजानन भोईर, सतीश येलकर, राकेश मोरे, चंद्रकांत धोंडगे, सुमित तांदळे, एमपीएल कमिटी अध्यक्ष निलेश केसरकर, सल्लागार भाई दसवते, मंगू जाधव, वैभव टेंबे, उपाध्यक्ष नंदुरज वाढवळ, बाळा पोवार, सचिव रोहित रातवडकर, सहसचिव फहद करबेलकर, खजिनदार राहुल बक्कम, सागर पाशिलकर, केदार जाधव, सदस्य निलेश उभारे, मुकुल मेहता, वैष्णव साठे, समीर महाडिक आदी उपस्थित होते.

## रायगडचा १४ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट संघ जाहीर

### अथर्व पाटील कर्णधार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षांखालील आमंत्रितांच्या साखळी स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा संघ निवडण्यात आला आहे. कर्णधारपदी अथर्व निलेश पाटील आहे, अशी माहिती जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

**संघ :** अथर्व निलेश पाटील (कर्णधार), क्रिश अंकल बहिरा, शौर्या कुंदन पाटील, पंकज प्रकाश इटकर, शौर्य रवींद्र गायकवाड, आदित्य सचिन पांडे, रचित मनिष करीया (यष्टीरक्षक), जिग्नेश शरद म्हात्रे, आर्यन दिलीप निकाळजे, अमय जयवंत भोसले, यशराज संदीप भोसले, ऋतुराज राजेश पाटील, आर्यक नरेंद्रकुमार जाधव, आरुष सचिन कोल्हे, स्टॅण्डबाय पार्थ मंगेश पवार, आराध्य निलेश पाटील, मिथीलेश नंदकुमार म्हात्रे, निलेश रामशंकर यादव, श्लोक विक्रांत कोळी, ऋषिकेश स्वप्नील पिंपळकर. रिजर्व्ह रुद्र महेश खोपकर, युवराज संदीप ठाकूर, अर्णव अविरत हसपाटील, केदार निलेश निसर्ग, आर्यन प्रकाश जाधव.



## जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयाचे सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेचे आयोजन खारघरच्या रेडक्लिफ ग्रुप ऑफ स्कूल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळवले.


स्पर्धा विविध वयोगट व वजनी गटात घेण्यात आली. यात १७ वर्षाखालील मुलांच्या गटात जयेश सोनावणे, अभिषेक फापळे, राज इंगळे यांनी प्रथम, पार्थ राजे द्वितीय, सतिश सहानी तृतीय, मुलींमध्ये सायली विशाल घरत, मिनाक्षी बेदी, कस्तुरी शिंदे प्रथम, शगुन विनोद विश्वकर्मा, सबिना खान, फातमा शेख, मुस्कान वालिलकर द्वितीय, एकता भाग्यवंत, ज्योती शर्मा, मिसबा बेबल, भावना सिंग, नशरा अन्सारी तृतीय, १९ वर्षाखालील मुलांमध्ये रवी विश्वकर्मा, सिद्धेश खडकर प्रथम, साजन शेख, कृणाल भिसे द्वितीय, मुलींमध्ये आरती दिवाकर, नंदिनी शर्मा, सानिया शेख, आफिया कुरेशी प्रथम, स्नेहा राय, अरबिया कुरेशी यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. अशा प्रकारे या विद्यार्थ्यांनी एकूण २७ बक्षिसे जिंकली. यापैकी प्रथम क्रमांकप्राप्त १२ विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर, क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, मराठी माध्यमिक विभागाचे संभाजी जाधव, अभिजित जोगदंडे यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## ‘सीकेटी’ची जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिका जिल्हास्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

ऐश्वर्या लक्ष्मण गोरे (बारावी सायन्स), प्रेम पाटील, अनामिका शर्मा (दोघेही अकरावी सायन्स) यांनी प्रथम, तर हेतल सातपुते (बारावी सायन्स) हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## विभागीय कबड्डी स्पर्धेत धाटाव संघ विजेता

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जय हनुमान वाशी कबड्डी संघातर्फे धाटाव विभागीय स्पर्धा रविवारी (दि. ११) आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत धाटाव विभागातील एकूण १६ संघांनी सहभाग नोंदविला. बलाढ्य म्हणून ख्याती असलेल्या नवयुवक सोनारसिद्ध धाटाव संघाने गावदेवी तळाघर संघावर सहज विजय संपादित करून विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत जवळपास सर्वच सामने चुरशीचे झाले. त्यामुळे प्रेक्षकांना पर्वणी पहायला मिळाले. अंतिम सामन्यात नवयुवक सोनारसिद्ध धाटाव संघातील ऋतिक रटाटेच्या चढाया व दिपेश रटाटेच्या उत्कृष्ट पकडी प्रेक्षणीय ठरल्या.



या स्पर्धेलाभारतीय जनता महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, रोहा तालुका कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष विजय मोरे, रोठ बुद्रुकचे सरपंच नितीन वारंगे, धाटाव विभाग अध्यक्ष निलेश वारंगे, वरसे गणाध्यक्ष दत्ता चव्हाण, घनश्याम कराळे, जगदिश भगत आदींनी भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

जय हनुमान वाशी संघातर्फे या कबड्डी स्पर्धेचे उत्तम आयोजन करण्यात आले होते. द्वितीय क्रमांक गावदेवी तळाघर संघाने, तृतीय क्रमांक वाघेश्वर रोठ खुर्द संघाने, तर चतुर्थ क्रमांक नवतरुण तळाघर संघाने पटकाविले. विजेत्या चारही संघाना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेत मालिकावीर धाटाव संघाचा ऋतीक रटाटे, उत्कृष्ट चढाईपटू रोठ खुर्द संघाचा आशिष मोरे, उत्कृष्ट पकडपटू धाटावचा दीपेश रटाटे, तर पब्लिक हिरो म्हणून गावदेवी तळाघर संघाचा प्रथमेश मुंडे ठरला. या सर्व खेळाडूंना मनगटी घड्याळ व सन्माचिन्ह देण्यात आले.

## राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी जिंकली पदके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात राज्य सिनियर पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी दोन रौप्य व एक कांस्यपदक पटकाविले.

हृतिक पोळ याने १२० किलो वजनी गटात रौप्य, सलोनी मोरेने ६६ किलो वजनी गटात रौप्य आणि अमृता भगतने ४७ किलो वजनी गटात कांस्यपदक प्राप्त केले.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग रायगडचे अरुण पाटकर, गिरीश वेदक, माधव पंडित, यशवंत मोकल, सचिन भालेराव, राहुल गजरमल, क्रीडा पत्रकार सुहास जोशी, महाराष्ट्र संघटनेचे सेकेटरी, संजय सरदेसाई यांनी पदकप्राप्त खेळाडूंचे अभिनंदन केले.





**पनवेल : शहरातील इदगाह मैदान येथे एमपीएल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या वेळी आयोजक अहसन नावडेकर, जवाद पटेल, सुफियान पटेल, नामाजा पटेल, आयन दुस्ते आदी उपस्थित होते.**




## जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत कर्जतच्या स्पर्धकांची बाजी

**कर्जत : प्रतिनिधी**



(छाया : विजय मांडे)

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने कर्जत तालुका बुद्धिबळ संघटनेने भारतीय दिग्गज बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांच्या वाढदिवसानिमित्त १३ व १७ वर्षाखालील जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत यजमान कर्जत तालुक्यातील खेळाडूंनी यश प्राप्त केले.

कर्जत शहरातील हनुमान मंदिराच्या सभागृहामध्ये जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास म्हात्रे आणि तालुकाध्यक्ष संजीव ठाकरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन झाले. या समारंभास सचिव अंकित जोशी, डॉ. प्रथमेश अळसुंदेकर आदी उपस्थित होते. दोन्ही गटांत अलिबाग, खालापूर, पनवेल, कर्जत आदी तालुक्यातील एकूण ९४ स्पर्धक सहभागी झाले होते. सार्थक मिंडे, कपिल कोलंबकर, यश हूंगुंड यांनी पंच म्हणून कामगिरी केली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. अनिरुद्ध जोशी यांच्या हस्ते झाला. या वेळी मनोगतात विलास म्हात्रे यांनी, ‘बुद्धिबळ खेळणारी मुले अभ्यासातही हुशार असतात असे अनेक चाचण्यांच्या निष्कर्षानंतर सिद्ध झाले आहे. त्यामुळे या खेळात पालकांनी आपल्या मुलांना सहभागी करावे.’ असे आवाहन केले. प्रताप गीते यांनीही आपला बुद्धिबळाचा अनुभव कथन केला.

**स्पर्धेचा गटनिहाय निकाल**

१३ वर्षाखालील : मुले-प्रथम : अथर्व वाघ (अलिबाग), द्वितीय गाडा कित (कर्जत), तृतीय कौस्तुभ भगत (पनवेल), मुली-प्रथम ज्ञानदा गुजराथी (कर्जत), द्वितीय गोमती कुंजीर (नेरळ, कर्जत); १७ वर्षाखालील : मुले-प्रथम शंतनू राऊत (नेरळ, कर्जत), द्वितीय सोहम मकोने (कर्जत), तृतीय : हर्ष अय्यर (कर्जत), मुली-प्रथम श्वेता चौरे (कर्जत), द्वितीय जान्हवी गंभीर (कर्जत).

## रायगड जिल्हा प्रशासनातर्फे उद्या कबड्डी चषक स्पर्धा

**अलिबाग :** जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि. १४) अलिबाग वेश्वी येथील पीएनपी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर रायगड जिल्हा प्रशासनामार्फत आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने कबड्डी चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत रायगड जिल्हा वरिष्ठ गट कबड्डी निवड चाचणी स्पर्धेतील प्रथम १६ पुरुष संघ आणि प्रथम आठ महिला संघ सहभागी होतील. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते व त्याच दिवशी संध्याकाळी पारितोषिक वितरण होणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com